cmyk

## संपादकीय

### विद्यार्थी सुरक्षेच्या नुसत्या घोषणाच !

सरकारने पुन्हा एकदा शाळांची तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. मुद्दा पुन्हा विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचाच आहे. या मुद्याशी संबंधित शाळांनी दिलेल्या माहितीची पडताळणी या तपासणीअंतर्गत केली जाणार आहे. बदलापूर घटनेला दीड वर्षांचा कालावधी उलटला तरीही हा मुद्दा सरकार धसास लावू शकलेले नाही.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२२३ | बुधवार दि.१० डिसेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### नागपुरात महिला कबड्डीपटूची आत्महत्या

नागपूर : नागपूरमध्ये महिला कबड्डीपटूने आत्महत्या केल्याची घटना घडली. कीटकनाशक प्राशन करून कबड्डीपटूने आयुष्य संपवले. सावनेरमध्ये ही घटना घडली असून, आर्थिक अडचणी, नोकरीचे आमिष आणि लग्नात झालेली फसवणूक या सर्व त्रासाला कंटाळून तिने आत्महत्या केली. सावनेर पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून, आरोपीचा शोध घेत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, किरण सूरज दाढे असे आत्महत्या केलेल्या महिला कबड्डीपटूचे नाव होते. स्वप्निल जयदेव लांबघरे असे आत्महत्या केलेल्या महिलेच्या पतीचे नाव असून तो सध्या फरार आहे.

### समृद्धी महामार्गावर पुन्हा भीषण अपघात

संभाजीनगरः समृद्धी महामार्ग आणि या महामार्गावरील अपघात हा संशोधनाचा विषय बनला असून, पुन्हा एकदा समृद्धी महामार्गावर अपघाताची घटना घडली आहे. या भीषण अपघातात कार जळून खाक झाली आहे. दैव बलवत्तर म्हणून कारमधील सर्व प्रवासी सुखरुप आहेत. समृद्धी महामार्गावरुन करमाडकडे जाताना लाहुकी फाट्यावरील चौकात सोमवारी दुपारी ३ वाजता अपघाताची घटना घडली. याठिकाणचा हा तिसरा अपघात असून, हे गतिरोधक अपघाताला आमंत्रण ठरत आहेत, अशी ओरड प्रवाशांकडून होत आहे. त्यामुळे, येथे दिशादर्शक फलक किंवा इतर उपाययोजना करण्याची मागणीही प्रवाशांकडून केली जात आहे.

### म्यानमार मध्ये भीषण हल्ला;१८ ठार

नवीदिल्लीः म्यानमार मध्ये एका चहाच्या दुकानावर झालेल्या लष्करी हवाई हल्ल्यात १८ नागरिकांचा मृत्यू झाला आहे. रात्री आठच्या सुमारास हा हल्ला झाला. या हल्ल्यात २० जण जखमी झाले असून, मृतांमध्ये पाच वर्षांचे मूल आणि दोन शिक्षकांचाही समावेश आहे. हे सर्वजण टीव्हीवर म्यानमार विरुद्ध फिलिपिन्स फुटबॉल सामना पाहत होते. हा हल्ला लोकशाही समर्थक सशस्त्र दलांना लक्ष्य करून सुरू असलेल्या घातक हवाई हल्ल्यांच्या मालिकेपैकी एक आहे. १ फेब्रुवारी २०२१ रोजी लष्कराने आंग सान सू की यांच्या निर्वाचित सरकारकडून सत्ता काबीज केल्यानंतर म्यानमारमध्ये राजकीय अस्थिरता आणि संघर्ष सुरू आहे.

### इंडिगो प्रकरणात तातडीने सुनावणी नाही

नवी दिल्लीः देशातील सर्वात मोठी विमानसेवा कंपनी असलेल्या इंडिगो सध्या प्रवाशांना होत असलेल्या गैरसोयीमुळे मोठ्या अडचणीत सापडली आहे. देशभरातील विमानतळांवर इंडिगोच्या अनेक विमानांची उड्डाणे पूर्वसूचना न देता रद्द झाल्यामुळे प्रवाशांचे प्रचंड हाल झाले आहेत. या गैरसोयीबद्दल हस्तक्षेप करण्याची मागणी करणाऱ्या एका याचिकेवर सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने तातडीने सुनावणी घेण्यास नकार दिला.भारताचे मुख्य न्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर एका वकिलाने हा मुद्दा मांडला आणि तातडीने सुनावणी करण्याची मागणी केली.

### निकालाच्या आधीच बार्शीत गुलाल उधळला

सोलापूर : बार्शी तालुक्यात कृषी उत्पन्न बाजार समितीच्या झालेल्या निवडणुकीत माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या गटाने १८ पैकी १८ जागांवर बाजी मारली आहे. नगरपरिषद निवडणुकीआधी माजी आमदार राजेंद्र राऊत आणि विद्यमान आमदार दिलीप सोपल यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या बळीराजा विकास पॅनेलने दणदणीत विजय मिळवत विरोधकांचा सुफडा साफ केला आहे. नगरपरीषद निवडणुकीच्या निकालाआधी बार्शीत लिटमस चाचणी झाली आणि त्यात माजी आमदार राजेंद्र राऊत हे यशस्वी झाले, अशी चर्चा सुरू आहे.

### आयपीएल लिलावाची अंतिम यादी जाहीर

नवीदिल्लीः इंडियन प्रीमियर लीगची लिलाव प्रक्रिया १६ डिसेंबर रोजी अबुधाबी येथे होणार असून, या लिलावात एकूण ३५० खेळाडूंवर बोली लावली जाणार आहे. यामध्ये २४० भारतीय तर ११० विदेशी खेळाडूंचा समावेश आहे. अलीकडेच वनडेमधून निवृत्ती घेतल्यानंतर पुन्हा मैदानात परतलेल्या दक्षिण आफ्रिकेच्या विकेटकीपर-फलंदाज क्विंटन डी कॉकचे नाव या अंतिम यादीत आहे. तर ऑस्ट्रेलियाचा अनुभवी फलंदाज स्टीव्ह स्मिथ हा देखील या यादीत आहे. आयपीएलच्या निवेदनानुसार यंदाच्या लिलावासाठी एकूण १३९० खेळाडूंनी नोंदणी केली होती.

# गळ्यात कापसाची माळ घालून विरोधक विधान भवनात

## ‘शेतकरी उपाशी, सरकार तुपाशी’ च्या घोषणा

नागपूर। प्रतिनिधी

**सध्या नागपुरात राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू आहे. नागपूर विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात मंगळवारी विरोधी पक्षाच्या आमदारांनी कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून जोरदार आंदोलन करत सत्ताधारी सरकारला धारेवर धरले. विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी गळ्यात कापसाच्या बोंडांची माळ घालून विधान भवनात प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांवर तीव्र संताप व्यक्त केला.**

महाविकास आघाडीच्या आमदारांनी एकत्रितपणे विधान भवनाच्या पायऱ्यांवर घोषणाबाजी करत सरकारचे लक्ष वेधले. या आंदोलनादरम्यान आमदारांनी हातात निषेधाचे फलक घेतले होते. ज्यावर ‘फसवणीस सरकार’ असे स्पष्टपणे लिहिले होते. याशिवाय



विरोधकांकडून विविध घोषणाबाजी करत विधान भवन परिसर दणाणून सोडला. शेतकरी उपाशी, सरकार तुपाशी!, शेतकऱ्यांची कर्जमाफी झालीच पाहिजे, कापसाच्या झाल्या वाती, सोयाबीनची झाली माती, अशा अनेक घोषणा यावेळी देण्यात आल्या. या आंदोलनात विजय वडेट्टीवार यांच्यासह विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे आणि महाविकास आघाडीचे अन्य प्रमुख नेते व आमदार सहभागी झाले होते. यावेळी बोलताना विरोधी पक्षनेते विजय ▶▶ पान २ वर

### संपूर्ण कर्जमाफी झाली पाहिजे

शेतकरी प्रचंड कर्जबाजारी झाला असून त्याची संपूर्ण कर्जमाफी झाली पाहिजे. कापूस, सोयाबीन, धान आणि तूर या पिकांना उत्पादन खर्चावर आधारित योग्य भाव मिळाला पाहिजे. अवकाळी पाऊस आणि नैसर्गिक संकटांमुळे झालेल्या नुकसानीची मदत तात्काळ शेतक-यांच्या बँक खात्यात जमा करावी. कापूस व सोयाबीन खरेदी केंद्र पूर्ण क्षमतेने सुरू करून खरेदीला गती द्यावी. तसेच शेतक-यांना न्याय मिळेपर्यंत महाविकास आघाडी आपला लढा सुरू ठेवेल, असा इशारा यावेळी विजय वडेट्टीवार यांनी दिला आहे.

# स्व.देशमुख यांचे आरोपी सुटले तर राज्यात एकही चाक फिरणार नाही-मनोज जरांगे



केज । प्रतिनिधी

मस्साजोगचे सरपंच दिवंगत संतोष देशमुख हत्या प्रकरणाला ९ डिसेंबर रोजी एक वर्ष पूर्ण झाले. त्या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील यांनी मस्साजोगमध्ये जाऊन पीडित देशमुख कुटुंबीयांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी स्व.देशमुख यांच्या कुटूंबियांचे सांत्वन केले. एक वर्ष झाले पण अद्याप न्याय मिळाला नाही काही जण म्हणतात जमीन मिळणार पण आरोपी जर सुटले तर जिल्हा बंद होईल. राज्यात एकही चाक फिरणार ▶▶ पान २ वर

### कृष्णा आंधळे का सापडत नाही?

आधी या प्रकरणाच्या तपासाचा वेग योग्य वाटत होता, कारण त्यावेळेस फडणवीस यांनी शब्द दिला होता. फडणवीस साहेबांच्या एका शब्दावर सगळे लोक शांत बसले होते. सरकार या प्रकरणात दबाव आणते काय बघितले पाहिजे? क्रूर हत्या करणारे बाहेर फिरतात, कृष्णा आंधळे कुठे आहे? असा सवालही जरांगे पाटील यांनी उपस्थित केला.

# डॉ.संपदाच्या मृत्यू प्रकरणात मुख्यमंत्र्याकडून स्पष्टीकरण

नागपूर । प्रतिनिधी

**फलटणमध्ये आत्महत्या केलेल्या बीड जिल्ह्यातील महिला डॉक्टरच्या तळहातावर लिहीलेले हस्ताक्षर तिचेच असल्याचे पडताळण्यात आले आहे. ज्या पोलिस आणि सॉफ्टवेअर इंजिनिअरची नावे त्यात नमूद करण्यात आली आहेत, ते तिला छळण्यात सहभागी असल्याचे समोर आले आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री भाजप आमदार अमित साटम यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देत होते.**

ऑक्टोबरमध्ये फलटण शहरातील एका हॉटेलमध्ये सरकारी रुग्णालयातील डॉक्टर मृतावस्थेत आढळली होती. तिच्या तळहातावर लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये तिने आरोप केला होता की, पोलिस उपनिरीक्षक गोपाल बदाणे



यांनी तिच्यावर अनेक वेळा बलात्कार केला, तर सॉफ्टवेअर इंजिनिअर प्रशांत बनकर यांनी तिचा मानसिक छळ केला. चिठ्ठीतील हस्ताक्षर आणि त्यात ज्यांची नावे नमूद करण्यात आली आहेत ते तिच्या मृत्यूत सहभागी आहेत का असा सवाल साटम यांनी केला. त्या महिला डॉक्टरने तिच्या हातावर एक नोट लिहिली होती आणि त्यात दोन ▶▶ पान २ वर

# जून ते ऑक्टोबर महिन्यातील अतिवृष्टी, अवकाळीची मदत मंजूर; शासन निर्णय जारी

मुंबई । प्रतिनिधी

जून ते ऑक्टोबर २०२२५ दरम्यान राज्यात विविध जिल्ह्यात अतिवृष्टी आणि पुरामुळे शेतीपिकांचं अतोनात नुकसान झाले. राज्य सरकारने ४ लाख ६ हजार ४३० हेक्टर क्षेत्रावरील बाधित शेतीपिकांसाठी ४८२ कोटी १० लाख ६९ हजार रुपयांच्या वितरणास मंजुरी दिली आहे. राज्य सरकारने याबाबतचा शासन निर्णय मंगळवारी (दि.९) जारी केला आहे.

यामध्ये दोन हेक्टरच्या मर्यादेत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्यात येईल, असे राज्य सरकारने स्पष्ट केले आहे. राज्यात ▶▶ पान २ वर

# लाडक्या बहिणीबद्दल बोलाल तर घरी बसाल

## मुख्यमंत्री फडणवीस यांनी सभागृहात आमदारांना सुनावले

नागपूर । प्रतिनिधी

सभागृहामध्ये मंगळवारी कामकाज सुरू असताना भाजपा आमदार अभिमन्यू पवार यांनी आपल्या प्रश्नासंदर्भात बोलत असताना लाडक्या बहिणीचा विषय काढला. त्यांच्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदारांना निर्देश देताना लाडक्या बहिणीबद्दल बोलाल तर घरी बसाल असा इशारा दिला.

नागपूर येथे हिवाळी अधिवेशन जोरदार सुरू आहे. मंगळवारी सकाळी सभागृहाचे कामकाज सुरू होण्यापूर्वीच विरोधकांनी शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी सभागृह बाहेर आंदोलन केले. त्यानंतर सभागृहात कामकाज सुरू झाल्यानंतर भाजपचे आमदार अभिमन्यू पवार यांनी विविध विषयावर बोलण्यास सुरुवात केली. त्याचदरम्यान विषयांतर करत लाडक्या बहिणीचाही मुद्दा त्यामध्ये घेतला. सभापतींनी हस्तक्षेप करत आता उत्तर आहे का म्हणून सांगितले. मुख्यमंत्री उत्तर ▶▶ पान २ वर

# तत्कालीन सरन्यायाधीश गवईंवर बूट फेकणाऱ्या वकिलास चपलेने मारहाण

नवी दिल्ली । वृतसंस्था

माजी सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्यावर बूट फेकण्याचा प्रयत्न करणारा वकील राकेश किशोर याला दिल्लीच्या कडकडडूमा कोर्ट परिसरात चपलेने मारहाण झाल्याची घटना समोर आली आहे. या हल्ल्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. दरम्यान, या प्रकरणी कोणतीही औपचारिक तक्रार दाखल करण्यात आलेली नाही.



कोर्ट परिसरात वकिलावर चपलेने हल्ला करण्यात आला. धक्कादायक बाब म्हणजे, मारहाण सुरू असताना वकील राकेश किशोर हे सनातन धर्म की जय अशा घोषणा देताना दिसत आहेत. यावेळी उपस्थित असलेल्या इतर वकील आणि लोकांनी मध्यस्थी करून परिस्थिती नियंत्रणात आणली. या घटनेबद्दल औपचारिक तक्रार दाखल करण्यात आलेली नाही. ▶▶ पान २ वर

# आईच्या जातीनुसार मुलीला अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र

## सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

नवी दिल्ली । वृतसंस्था

एका अल्पवयीन मुलीच्या शिक्षणाची सोय करण्याच्या उद्देशाने एका दुर्मिळ निर्णयात, सर्वोच्च न्यायालयाने एका मुलीला तिच्या आईच्या ‘आदि द्रविड’ जातीवर आधारित अनुसूचित जाती प्रमाणपत्र देण्यास मान्यता दिली. विशेष म्हणजे, तिची आई एका बिगर-अनुसूचित जातीच्या व्यक्तीशी विवाहित आहे. दरम्यान, मुलाला वडिलांकडूनच जात वारसा हक्काने मिळते या नियमाला आव्हान देणाऱ्या अनेक ▶▶ पान २ वर

# तुकाराम मुंढेविरूद्ध सभागृहात राजकारण तापले; विजय वडेट्टीवारांनी घेतली बाजू

नागपूर । प्रतिनिधी

हिवाळी अधिवेशनामध्ये सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांच्याविरुद्ध लक्षवेधी आणण्यावरुन राजकीय वातावरण तापले. यावरून सभागृहात तुकाराम मुंढेंच्या समर्थकांकडून आपणास बघून घेऊ, अशी धमकी आल्याचे



आमदार कृष्णा खोपडे यांनी म्हटले. यावेळी, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी मुंढेंची बाजू घेतली. दरम्यान, आमदार प्रवीण दटके यांनीही सभागृहात तुकाराम मुंढेंविरुद्ध तक्रार केली आहे.

आ.खोपडे म्हणाले, तुकाराम मुंढे यांनी चुकीच्या पद्धतीने स्मार्ट सिटी प्रकल्पाचा अतिरिक्त पदभार आपल्याकडे ठेऊन घेतला होता. यासंदर्भात आपण ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०५ डिसेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत


| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५८.०० क्विंटल | २,३९० | ३,१४० | २,७९४ |
| ज्वारी/हायब्रिड : ३८.५० क्विंटल | १,९२१ | ३,११० | २,७०२ |
| मका/लोकलः ७.०० क्विंटल | १,६२६ | १,६२६ | १,६२६ |
| तूर : ३.५० क्विंटल | ६,४०० | ६,४०० | ६,४०० |
| उडीद :१८.०० क्विंटल | ३,५०० | ५,१६० | ४,६१५ |
| बाजरीः १४.५० क्विंटल | २,७०२ | ५,५२१ | ३,२५४ |
| मुगः १.५० क्विंटल | ५,५०० | ५,८५० | ५,६७५ |
| सोयाबीनः १७५.५० क्विंटल | ३,६०० | ४,५५० | ४,३६४ |
| हरभराः १.०० क्विंटल | ५,२०० | ५,२०० | ५,२०० |

# राज्यात स्ट्राँग रूमबाहेर कार्यकर्त्यांचा खडा पहारा

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यात नगरपालिका आणि नगर परिषदांच्या निवडणुकांचा दुसरा टप्पा २० डिसेंबर रोजी पूर्ण होईल. हायकोर्टाच्या निकालानंतर २१ डिसेंबरला एकदाच मतमोजणी होईल. तोपर्यंत मतपेट्या स्ट्राँग रूममध्ये ठेवण्यात आल्या आहेत. पोलिसांसोबतच कार्यकर्ते, नेते सुद्धा या स्ट्राँग रूमला खडा पहारा देत आहेत. तीन शिफ्टमध्ये सुरक्षा देण्यात येत आहे. राज्यात अनेक ठिकाणी अशी स्थिती दिसत आहे.**

निवडणुका पार पडलेल्या



भागातील ईव्हीएम मशिन स्ट्राँग रूममध्ये सुरक्षित ठेवण्याची मोठी जबाबदारी निवडणूक विभाग, पोलिसांवर आली आहे. त्यातच महाविकास आघाडीतील विरोधी पक्षांनी अविश्वास दाखवल्याने मराठवाड्यात ठिकठिकाणी स्ट्राँग रूमबाहेर पदाधिकारी-कार्यकर्त्यांचा खडा पहारा सुरू आहे. विरोधकांप्रमाणेच आता परभणीत सत्ताधारी अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने स्थानिक प्रशासनावर अविश्वास दाखवत तीन शिफ्टमध्ये पहारा सुरू केला आहे. गंगाखेड, जिंतूर आणि पाथरी नगरपालिकेत मोठ्या प्रमाणात पैसे वाटप करण्यात आल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. परभणीचे खासदार संजय जाधव यांनी एकट्या पाथरी विधानसभा मतदारसंघात शंभर कोटींची उलाढाल झाल्याचा आरोप केला आहे. ▶▶ पान २ वर

### बीडमधील स्ट्राँग रूमबाहेर पहारा

मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर स्ट्राँग रूममध्ये ठेवलेल्या ईव्हीएम मशिन/मतपेट्यांच्या सुरक्षेसाठी दोन टप्प्यांत एसआरपीएफ आणि पोलिस तैनात करण्यात आलेले आहेत. मात्र अनपेक्षित निकाल लागतात असा आरोप करत महाविकास आघाडीने बीड गेवराई गंगाखेड आदी ठिकाणी स्ट्राँग रूमच्या बाहेर पॅन्डॉल टाकून २४ तास पहारा द्यायला सुरुवात केली आहे.

cmyk

## अग्रलेख

# विद्यार्थी सुरक्षेच्या नुसत्या घोषणाच !

विद्यार्थी सुरक्षेच्या नुसत्या घोषणाच !

सरकारने पुन्हा एकदा शाळांची तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. मुद्दा पुन्हा विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचाच आहे. या मुद्याशी संबंधित शाळांनी दिलेल्या माहितीची पडताळणी या तपासणीअंतर्गत केली जाणार आहे. बदलापूर घटनेला दीड वर्षांचा कालावधी उलटला तरीही हा मुद्दा सरकार धसास लावू शकलेले नाही. त्या घटनेनंतर ढिगाने सरकारी आदेश निघाले. पण त्यांचेही पुढे काही झालेले नसावे. त्यामुळेच शाळा तपासणीच्या शिळ्या कढीला सरकारने उकळी आणली असावी.

बदलापूरच्या दुर्दैवी घटनेनंतर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सरकारने अनेक आदेश काढले. शाळा परिसरात सीसीटीव्ही बसवणे, सर्व कर्मचाऱ्यांची कसून तपासणी, विद्यार्थी बस वाहतूक नियमांची कडक अंमलबजावणी, काही इयत्तांसाठी महिला शिक्षकांची नेमणूक, शाळेची बस सुविधा असल्यास चालक आणि इतर कर्मचार्यांची अल्कोहोल तपासणी आणि शाळेच्या एक किलोमीटर परिसरात सिगारेट किंवा तंबाखूची दुकाने नको अशा अनेक नियमांचा त्यात समावेश आहे. शाळांमध्ये त्याची अंमलबजावणी सुरू आहे किंवा कसे, शाळांनी दिलेल्या माहितीची सत्यता याची पाहणी करण्यास सुरुवात झाली असल्याचे सांगितले जाते. जेव्हा हा आदेश पहिल्यांदा काढला गेला तेव्हाच त्याचे पालन झाले नाही तर शाळांना अनुदान रोखण्याची किंवा मान्यता रद्द करण्याची तंबी सरकारने दिली होती. आतापर्यंत अशा किती शाळांची मान्यता किंवा अनुदान रद्द केले गेले याचा खुलासा सरकार करेल का? तसे झाले असते तर माध्यमात वृत्त नक्कीच प्रसिद्ध झाले असते. सरकारच आदेशाविषयी गंभीर नसेल तर त्याची पत्रास इतरांनी ठेवावी अशी अपेक्षा सरकार तरी करू शकेल का? बदलापूर घटना घडून आणि त्यानंतर आदेश देऊन अठरा-एकोणीस महिन्यांचा कालावधी उलटून गेला आहे. इतक्या उशिरा पडताळणी करण्याची गरज का भासली असावी? इतके महिने काय केले? शाळांनी असत्य माहिती दिली असे सरकारला वाटत असावे का? एरवीही आदेश काढले जातच असतात. उदाहरणार्थ, विद्यार्थ्यांच्या पाठीवरचे ओझे. ते कमी झाले का? मासिक पाळी स्वच्छता धोरण सरकारने मंजूर केले आहे. मुलींना सॅनिटरी पॅड मोफत वाटप केले जाणार होते. त्याचा फायदा किती मुली घेतात? मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह बंधनकारक आहे. ग्रामीण भागातील सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी पुरवण्याचे नियोजन सुरू असल्याची माहिती राज्याच्या शिक्षणमंत्र्यांनी माध्यमांना दिली होती. त्यालाही अर्धे वर्ष झाले असावे. किती शाळांमधील विद्यार्थ्यांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळते? अशा अनेक आदेशांचे पुढे नेमके काय होते? आदेशांची अंमलबजावणी झाली असती तर सरकारनेच त्याचे ढोल पिटले असते. तेव्हा अशा विविध आदेशांचे आजचे वास्तव सरकार सांगू शकेल का? त्यांची पण पडताळणी सरकार करणार आहे का? आदेश अमलात आणले नाहीत तरी किंवा आणले गेले अशी शाब्दिक माहिती दिली तरी कारवाईला सामोरे जावे लागत नाही असाच ग्रह लोकांच्या आणि प्रशासकीय पातळीवर रुजलेला आढळतो. कारण नियम पाळला नाही म्हणून सरकारने कारवाई केल्याची उदाहरणे विरळासुद्धा आढळत नाहीत किंवा तसे घडत असेल तर निदान लोकांना तरी तसे ज्ञात नसावे. तेव्हा विद्यार्थ्यांशी संबंधित नव्याने कोणतेही आदेश जाहीर करण्यापूर्वी भूतकालीन आदेशांचा धांडोळा सरकारने एकदा घ्यावा. त्या सगळ्या आदेशांची अंमलबजावणी करावी. त्यांची पडताळणी करावी. नियमभंगाच्या कारवाईचे उदाहरण घालून द्यावे. मगच नवीन आदेश द्यावेत. असे झाले तर सरकारी आदेशांबद्दल विश्वासार्हता निर्माण होऊ शकेल. कारवाईचा धाक निर्माण होऊ शकेल. सध्या उपरोक्त पडताळणी सुरू असेल तर तिच्या पूर्ततेनंतर आढळलेले वास्तव लोकांसमोर मांडावे. विद्यार्थ्यांची सुरक्षितता हा पालकांसाठी संवेदनशील आणि भावनाप्रधान मुद्दा आहे. त्याविषयी सरकार आणि शाळा व्यवस्थापन किती गंभीर आहे? कोणत्या उपाययोजना आखल्या जात आहेत? त्याविषयी जाणून घेणे पालकांचा हक्क आहे आणि सरकार त्याला उत्तरदायी आहे. प्रश्न विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा आहे. निदान त्यात तरी कोणतीही कसर पालकांच्या अनुभवाला येऊ नये इतकीच पालकांची अपेक्षा आहे.

# विधानपरिषदेतील लक्षवेधीला मंत्री पंकजाताई मुंडेंचे परफेक्ट उत्तर

## नाग नदी प्रदूषण निर्मूलनासाठीची कामे तातडीने पूर्ण करण्याचा प्रयत्न

**नागपूर । प्रतिनिधी**

**राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेंतर्गत नागपूर येथील नाग नदी प्रदूषण प्रतिबंध प्रकल्पाच्या १,९२६ कोटींच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या प्रकल्पाची कामे तातडीने पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल, असे पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी विधान परिषदेत सांगितले.**



सदस्य डॉ.परिणय फुके यांनी नाग नदी प्रदूषणाबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य प्रसाद लाड यांनी सहभाग घेतला. यावर पंकजाताई मुंडे यांनी सभागृहात परफेक्ट उत्तर दिले. पर्यावरणाबाबत करण्यात येत असलेल्या उपाययोजनांबाबत माहिती देताना मंत्री पंकजाताई मुंडे म्हणाल्या, नाग नदी प्रदूषण निर्मूलनाबाबत एकूण पाच पॅकेजेसमध्ये कामाचे नियोजन केले जात आहे. यामध्ये एसटीपी, सिवरेज लाईन, विद्युत शव दाहिनी आदींचा समावेश आहे. नाग नदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्पांतर्गत ९२ दशलक्ष लिटर प्रतिदिन क्षमतेचे मलजल शुद्धीकरण केंद्र प्रस्तावित आहे. नदीच्या पाण्यावर प्रक्रिया करून ते पुढे सोडण्यात येत आहे, त्यामुळे गोसीखुर्द धरणातील मासेमारी नियमित सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. एसटीपी प्रकल्पांपैकी ११ प्रकल्प बंद असल्याबाबत सदस्य डॉ.परिणय फुके यांनी दिलेल्या माहितीनुसार याबाबत एका समितीच्या माध्यमातून पुन्हा तपासणी करून आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असेही पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी यावेळी सांगितले. पर्यावरण उपाययोजनांसाठी जागतिक पातळीवरील तज्ज्ञांची देखील मदत घेण्यात येत असल्याची माहिती देऊन जायका कंपनीच्या निकषांनुसार सर्व कामे करण्यात येत असून सर्व कामे नियोजित वेळेपूर्वी पूर्ण करण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# परतुर भोकरदन जालनासाठी तिन मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन उपलब्ध

**जालना । प्रतिनिधी**

**जालना जिल्हा पोलीस दलात एकुण १९ पोलीस ठाणे कार्यारत असुन पोलीस ठाणे हद्दीत खुन, खुनाचा प्रयत्न, दरोडा, दरोडयाचा प्रयत्न, दुखापत, जबरी दुखापत, फुस लावुन पळुन नेणे, बलात्कार, आत्महत्यास प्रवृत करणे, जबरी चोरी, चोरी, घरफोडी, पोस्को, हुंडा बळी, अंमली पदार्थ विरोधी कार्यावाही असे गुन्हे घडत असतात. पोलीस दलाकडून आरोपी विरुध्द घटनास्थळावरील पुरावे गोळा केले जात होते, परंतु पुरावे गोळा करतांना पोलीसांना अडचणी निर्माण होत होत्या.**



आता महाराष्ट्र शासनाने जालना जिल्हा पोलस दलासाठी अत्याधुनिक तिन मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन्स उपलब्ध करुन दिल्या असून जिल्हयात २४७ उप विभागीय अधिकारी कार्यालय येथे उपलब्ध राहणार आहे. सदर मोबाईन फॉरेन्सिक व्हॅनमध्ये भौतीक, रासायनिक, जैविक व डिजीटल पुरावे गोळा करण्याकरीता किट्स, रसायने व साध सामुग्री उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन्स हया जिल्हयातील घडणाऱ्या सर्व घटनास्थळी विनाविलंब भेट देऊन आरोपी विरुध्द भौतीक, रासायनिक, जैविक व डिजीटल पुरावे गोळा केल्याने आरोपीस मा. न्यायालयात शिक्षा होण्यास मदत होणार आहे. तसेच जालना जिल्हा पोलीस दलातील उप विभाग जालना, भोकरदन व परतुर या ०३ मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन्स मिळालेल्या आहे. सर्व मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन्स हया उप विभागा प्रमाणे कार्यरत असणार असून त्यावर उप विभागीय पोलीस अधिकारी हे देखरेख ठेवणार आहे.

# दिलीप कांकरिया यांना मातृशोक

**पाटोदा । प्रतिनिधी**



**पाटोदा येथील सुप्रसिध्द व्यापारी दिलीप, अजित, जितेंद्र कांकरिया यांच्या मातोश्री तथा संकेतचे संपादक नरेन्द्र कांकरिया, पाटोदा येथील जेष्ठ विधिज्ञ नेमीचंद, गणेशलाल तथा प्राचार्य राजेंद्र कांकरिया यांच्या जेष्ठ वाहिनी, स्व. देवीचंदजी कांकरिया यांच्या धर्मपत्नी रामप्यारीबाई कांकरिया (८५वर्ष) यांचे आज मंगळवार दि. ९ /१२/२०२५ रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्या कांकरिया परिवारातील सर्वात जेष्ठ सदस्य होत्या. त्यांच्या निधनाने कांकरिया परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.**

स्व. दगडूरामजी व सोनाबाई कांकरिया यांची सहा मुले. त्यातील देवीचंद हे सर्वात जेष्ठ पुत्र, त्यांचे १९९६ मध्ये निधन झाले. त्यानंतर परिवारात सर्वात जेष्ठ म्हणून रामप्यारीबाई यांनी संपूर्ण मोठ्या परिवाराला मात्रू प्रेम दिले. त्यांचे आज निधन झाले. हा या परिवारावरचा मोठा आघात मानला जात आहे. रामप्यारीबाई या अत्यंत धार्मिक व सहिष्णू वृत्तीच्या म्हणून ओळखल्या जात असत. स्व. रामाप्यारीबाई यांचा अंत्यविधी आज बुधवार रोजी सकाळी १० वाजता अमरधाम पाटोदा येथे होणार आहे. त्यांच्या पश्चात दिलीप, अजित, जितेंद्र ही ०३ मुले, शांता, लता या ०२ मुली, सुना, नातवंडे, असा मोठा परिवार आहे.

# संत केदारी महाराज साधना स्थळ हकाऱ्यामाळ येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**परळी । प्रतिनिधी**

**तालुक्यातील वैजवाडी येथील श्री गुरु संत केदारी महाराज साधना स्थळ हकाऱ्यामाळ येथे १३ ते २० डिसेंबर २०२५ दरम्यान अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे या सप्ताह निमित्त महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार गायक वादक आणि भजन असे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे तरी परळी पंचक्रोशीतील भाविकांनी या सर्व धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन संत सोपान काका महाराज उखळीकर फडाच्या वतीने करण्यात आले आहे.**






परळी पंचक्रोशीतील सर्व भाविकांना कळविण्यात आनंद होतो की श्री संत केदारी महाराज यांच्या पदपरश्याने पावन झालेल्या हकाऱ्या माळ येथे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी पंचक्रोशीतील भाविक भक्तांच्या सहकार्याने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले आहे श्री संत केदारी महाराजांनी हकाऱ्या माळावर बरीच वर्ष भजनाची साधना केलेली आहे त्याच ठिकाणी श्री संत सोपान काका महाराजांनी पंचक्रोशीतील टाळकरी व अन्नदात्यांच्या सहकार्याने कार्यक्रमाची सुरुवात केली पुढे वैकुंठ ह भ प पंढरीनाथ महाराज वैकुंठ उत्तम महाराज उखळीकरांनी या कार्यक्रमाची जोपासना केली आणि मार्गशीष अमावस्येला या यात्रा भरवली आजही या यात्रेनिमित्त भाविक श्री संत केदारी महाराजांच्या दर्शनासाठी आवर्जून येतात आजही कार्यक्रमाची जोमाने वाटचाल सुरू आहे तरी भाविकांनी या अखंड हरिनाम सप्ताहात सर श्रवणमृताचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा तसेच ह भ प भागवताचार्य संतोष महाराज वनवे, ह भ प भागवताचार्य अच्युत महाराज डोंगरे, ह भ प चैतन्य महाराज उखळीकर, ह भ प भागवताचार्य वासुदेवानंद महाराज शास्त्री, ह भ प भागवताचार्य केशव महाराज घुले टाकळीकर, ह भ प भागवताचार्य बाळ महाराज उखळीकर, ह भ प रामकृष्ण महाराज सानप येवला यांची कीर्तन सेवा होणार आहे तर २० डिसेंबर रोजी पहाटे पाच ते सात काल्याचे किर्तन ह भ प भागवताचार्य माधव महाराज उखळीकर यांचे होणार आहे तरी भाविकांनी या सर्व सप्ताहातील धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन ह भ प केशव महाराज, ह भ प विठ्ठल महाराज उखळीकर, उखळीकर ह भ प विश्वंभर महाराज उखळीकर, दीनानाथ उत्तम महाराज उखळीकर व समस्त उखळीकर महाराज मंडळी व उखळीकर फडावरील संपूर्ण भजनी मंडळी हकाऱ्या माळ वैजवाडी तसेच श्री संत केदारी महाराज युवा मित्र मंडळ व समस्त गावकरी मंडळी वैजवाडी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# नगरला भरणारा हुडहुडी; हवामान खात्याचा इशारा, वाचा अपडेट

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

**बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या 'सेन-यार' आणि 'दिट-वाह' या दोन चक्रीवादळांच्या पार्श्वभूमीवर डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात काहीसा चढ-उतार जाणवला असला, तरी राज्यात पुन्हा एकदा थंडीचा कडाका वाढला आहे. आगामी १२ दिवस म्हणजेच १९ डिसेंबरपर्यंत महाराष्ट्रात तीव्र थंडी कायम राहणार असल्याचा अंदाज हवामान तज्ज्ञांनी वर्तवला आहे.**

मुंबई आणि काही प्रमाणात कोकण वगळता उत्तर महाराष्ट्र, मराठवाडा, खान्देश व विदर्भातील अनेक भागांत दिवस-रात्र हुडहुडी जाणवत आहे. विशेषतः नाशिक, छत्रपती सभाजीनगर, अमरावती, यवतमाळ, वाशिम, गोंदिया परिसरात किमान तापमानात मोठी घसरण नोंदवली जात आहे. राज्यातील थंडीबाबत पुण्याचे हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी सांगितले की, सध्याची मालेगाव (नाशिक) येथे किमान तापमान ९ अंश तर कमाल तापमान २६.८ आहे. तर अमरावती, यवतमाळ, गोंदिया, वाशिम जिल्ह्यात थंडीची लाट आहे. तर एकांकी किमान तापमान व केवळ जाणवणारी थंडी ही अहिल्यानगर ९.५, जळगाव ९.४, जेऊर ९, छत्रपती संभाजीनगर १०, नांदेड ९.९, नागपूर ९.६ अंश आहे. उत्तर भारतातून येणारे ईशान्यई वारे महाराष्ट्रात पूर्वीय होत असून हवेचा दाब ही पूर्ववत म्हणजे १०१६ हेक्टपास्कल होत आहे.

पान १ वरून...

### गळ्यात कापसाची माळे घालून

वडेट्टीवार यांनी विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांची दयनीय अवस्था मांडली. विदर्भात अधिवेशन आहे. कापूस, सोयाबीन यांसह इतर शेतमालाला योग्य भाव मिळत नाही. या भूमिकेतून किमान सरकारने आता तरी जागे व्हावे, एवढीच आमची अपेक्षा आहे. शेतकऱ्याला न्याय मिळालाच पाहिजे, अशी स्पष्ट मागणी त्यांनी केली. यावेळी विजय वडेट्टीवार यांनी सध्याच्या बाजारभावावर आणि शासकीय धोरणांवर सडकून टीका केली. शेतकऱ्याला हमीभाव मिळालेला नाही. सध्या कापसाला फक्त ७ हजार रुपये प्रति क्विंटलच्या आसपास दर मिळत आहे. सोयाबीनलाही भाव नाही. कुठला हमीभाव आहे? कुठे कापसाला दर आहे? सध्या कापूस उत्पादक शेतकरी प्रचंड संकटात आहेत. कापूस शेतकऱ्याला केवळ १५ क्विंटल हेक्टरी मदतीची घोषणा केली जात आहे. या परिस्थितीत जर शेतकऱ्याला १० ते १५ क्विंटल कापूस येत असेल तर तो विकणार कुठे? असा सवाल विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. सरकारला शेतकऱ्यांप्रती अजिबात आस्था नाही. राज्यकर्त्यांना लाज वाटत नाही, शेतकऱ्यांवरील अन्याय दूर करण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले आहे, असेही वडेट्टीवार यांनी म्हटले.

-------------

### डॉ.संपदाच्या मृत्यू प्रकरणात

नावे नमूद केली होती. तपासात आढळून आले आहे की हस्ताक्षर तिच्याशी जुळते. तपासात दिसून आले की, पोलिस उपनिरीक्षक गोपाल बदाणे यांनी लग्नाचे आश्वासन देऊन तिचे लैंगिक शोषण केले. दुसऱ्या आरोपीने (बनकर) देखील तिची फसवणूक केल्याचे आढळून आले आहे. तथापि, यामध्ये इतर कोणी सहभागी आहे का याची चौकशी करण्यासाठी न्यायालयीन चौकशीचे आदेश दिले आहेत. एक महिला आयपीएस अधिकारी या प्रकरणाची चौकशी करत असल्याचेही फडणवीस म्हणाले. या प्रकरणाचा राजकारण करण्याचा प्रयत्न करण्यात आला, जो अत्यंत दुर्दैवी आहे. मुख्यमंत्र्यांनी सभागृहाला आश्वासन दिले की महिलांची सुरक्षितता अत्यंत महत्त्वाची आहे आणि सरकार त्यासाठी वचनबद्ध आहे.

-------------

### स्व.देशमुख यांचे आरोपी सुटले तर

नाही, असा इशारा मनोज जरांगे यांनी शासन आणि प्रशासनाला दिला.

ते पुढे म्हणाले, या प्रकरणात निकाल येण्यासाठी वर्ष उजडणार नाही असे वाटलं होते, त्याच्या वल्गना मुख्यमंत्र्यांकडून झाल्या होत्या. एक वर्षाच्या आत या प्रकरणातील आरोपींना फासवर लटकू असा शब्द दिला होता. मात्र, या प्रकरणात दिरंगाई होत आहे. सरकार पक्षात अजितदादांचा एक आमदार आहे, त्यांनी एक टायर पंक्चर केलेले आहे. तोच या प्रकरणात यंत्रणा चालवत आहे, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी नाव न घेता पुन्हा एकदा आमदार धनंजय मुंडे यांना लक्ष्य केले. हे प्रकरण भिजत घोंगडे ठेवायचे आहे का, अशी शंका येत असल्याचेही त्यांनी म्हटले. संतोष देशमुख यांच्या प्रकरणात आम्ही एक आहोत, एका लेकीला आणि एका लेकाला आपला बाप दिसत नाही. आरोपी तातडीने फासावर गेल्याशिवाय आमचे समाधान नाही. परळीवाल्यांनी काही माणसे पेरुन ठेवले आहेत, त्यांनी काही माणसाला सांगितले आहे की, आपला एक माणूस सुटणार असे बोला. हे परळीतल्या लोकांकडून बोलून घेतले जात आहे, असे मनोज जरांगे यांनी सांगितले. तसेच, ज्या दिवशी या प्रकरणातील आरोपी सुटेल त्या दिवशी हा जिल्हा पूर्ण बंद ठेवायचा, त्यानंतर राज्य बंद ठेवण्यात येईल, असेही त्यांनी म्हटले. परळीवाला असे का घडवून आणतो हे सरकारने शोधले पाहिजे. सरकार अडचणीत येण्याचे स्टेटमेंट तो का करतो हे बघितले पाहिजे. मात्र, तू सुटणार नाही हे सत्य आहे, असा इशाराही जरांगे पाटील यांनी दिला आहे. सरकारने हा विषय चार-पाच महिन्याच्या आत संपवावा. पुढे कुटुंबांनी हाक दिल्यास आम्ही कशाचा विचार करणार नाहीत. ओबीसीचे नेते कितीतरी आहेत त्यांना मोठे करा. अशा क्रूर लोकांना सांभाळत असाल तर आम्हाला अजित दादांचा राग येणार. असेही जरांगे पाटील यांनी म्हटले.

----------

### तत्कालीन सरन्यायाधीश गवईंवर बूट

यावर राकेश किशोर म्हणाले, एक तरुण वकीलाने माझ्यावर चपलेने हल्ला केला. त्यानंतर आम्ही तेथून निघालो. त्यांनी असेही सांगितले की, आम्ही सरन्यायाधीशांवर बूट फेकल्याबद्दल आम्हाला शिक्षा करत आहोत. त्यानंतर आम्ही सनातनच्या घोषणाही दिल्या. या प्रकरणी तक्रार दाखल केली नाही. वकिलांविरुद्ध तक्रार करून काय उपयोग? ते सर्व आमचेच बंधू आहेत. हे कुटुंबातील एक किरकोळ प्रकरण आहे.

------------

### लाडक्या बहिणीबद्दल

देत असताना त्यांनी कोणत्याही विषयांमध्ये लाडक्या बहिणीचा विषय मिश्र करू नये लाडक्या बहिणीची योजना चालू राहील ती बंद पडणार नाही आणि सर्वांनी कोणत्याही विषयात लाडक्या बहिणीचा विषय मध्येच घालायचा नाही लाडक्या बहिणीचा विषय काढाल तर घरी बसाल असाच इशारा त्यांनी उपस्थित आमदारांना दिला.

-----------

### जून ते ऑक्टोबर महिन्यातील

अतिवृष्टीने शेती पिकांचे अतोनात नुकसान झाले. राज्य सरकारच्या आकडेवारीनुसार जून ते सप्टेंबर दरम्यान ८४ लाख हेक्टरवरील शेती पिकं बाधित झाली. त्यासाठी राज्य सरकारने ३१ हजार कोटींच्या पॅकेजची घोषणा केली. परंतु शासन निर्णयात मात्र मदतीचे दर आणि निकष जुनेच ठेवले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची तुटपुंज्या मदतीवर बोळवण करण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे.

----------

### तुकाराम मुंढेंविरूद्ध सभागृहात राजकारण

लक्षवेधी दिली असून, त्या मध्ये सविस्तरपणे लिहिण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. नागपूर अधिवेशनासाठी आलो असता, मला दोन जणांचे धमकीचे फोन आल्याचे त्यांनी म्हटले. २० ऑक्टोबर रोजी धनंजय भागवत कक्ष अधिकारी यांनी हे पत्र लिहिले आहे. त्यामध्ये नागपूर स्मार्ट सिटी संदर्भातील नियुक्तीवरुन कारवाई करण्याचे पत्र असल्याचे दटके यांनी निदर्शनास आणून दिले. यावेळी बोलताना, विजय वडेट्टीवार यांनी तुकाराम मुंढेंची बाजू घेतली. नागपूर महापालिकेत असताना तुकाराम मुंढेंना आयुक्तांनी क्लीन चीट दिली आहे, हे रेकॉर्डवर आहे. महिला आयोगाकडेही तक्रार झाली होती, पण ज्या महिलेने तक्रार केली त्या महिलेवरच महिला आयोगाने दंड लावला आहे. केंद्रीय महिला आयोगानेही क्लीन चीट दिली आहे. त्यामुळे, तुकाराम मुंढे यांच्यावर जे आरोप झाले आहेत, ते कोणाच्या स्वार्थापायी झाले आहेत. मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करावी आणि सत्य परिस्थिती तपासून कारवाई करावी. पण, निर्दोष असतील तर कुठल्याही दबावाखाली ही कारवाई होऊ नये, असे वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

--------------

### आईच्या जातीनुसार मुलीला

याचिकांवर अजून निर्णय व्हायचा आहे. पुद्दुचेरीतील मुलीला अनुसूचित जातीचे जात प्रमाणपत्र देण्याच्या निर्देश देणाऱ्या मद्रास उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देण्यास सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठाने नकार दिला. कारण, प्रमाणपत्राशिवाय तिच्या शैक्षणिक कारकिर्दीला धक्का बसू शकतो, असे न्यायालयाने म्हटले आहे. खंडपीठाने म्हटले की, ''आम्ही कायद्याचा प्रश्न खुला ठेवत आहोत.'' यानंतर सरन्यायाधीशांनी पुढे जे म्हटले त्यावर मोठा वाद होऊ शकतो. ''बदलत्या काळानुसार, आईच्या जातीवर आधारित जात प्रमाणपत्र का देऊ नये?'' याचा अर्थ असा होईल की, अनुसूचित जातीच्या महिलेचा विवाह उच्च जातीच्या पुरुषाशी झाला असल्यास आणि तिची मुले उच्च-जातीच्या कौटुंबात वाढली असली तरीही, त्यांना अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र मिळण्याचा हक्क असेल.

----------

### राज्यात स्ट्रॉंग रूमबाहेर कार्यकर्त्यांचा

मराठवाड्यात परळीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांनी सर्वप्रथम आमदार धनंजय मुंडे व त्यांच्या समर्थकांकडून ईव्हीएम ठेवण्यात आलेल्या स्ट्रॉंग रूममध्ये दगाफटका होऊ शकतो, अशी शंका उपस्थित करत पहारा देण्यासाठी मुक्कामाची व्यवस्था करण्याची मागणी केली. स्ट्रॉंग रूमबाहेर खडा पहारा देण्याचे प्रकार मराठवाड्यात अनेक ठिकाणी होऊ लागले आहेत. बीडसह जिल्ह्यात अनेक ठिकाणी पदाधिकारी, कार्यकर्ते कडाक्याच्या थंडीत शेकोटी पेटवून स्ट्रॉंग रूमसमोर बसल्याचे पहायला मिळत आहेत. त्यानंतर आता अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानेही जिंतूर, गंगाखेडमध्ये तीन शिफ्टमध्ये कार्यकर्त्यांची नियुक्ती करत स्ट्रॉंग रूमवर वॉच ठेवण्यास सुरुवात केली आहे. अगदी स्वखर्चाने सीसीटीव्ही देखील काही ठिकाणी बसवण्यात आले आहेत. जिंतूरमध्ये राष्ट्रवादीचे माजी आमदार विजय भांबळे विरुद्ध परभणीच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर अशी फाईट आहे. तिकडे गंगाखेडमध्ये राष्ट्रवादीचेच डॉ. मुधुसुदन केंद्रे विरुद्ध आमदार रत्नाकर गुट्टे यांच्यात वर्चस्वाची लढाई आहे. पाथरीमध्ये काँग्रेसचे बाबाजानी दुर्राणी आणि एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे सईद खान हे निवडणूक काळात एकमेकांना भिडले होते. ही सगळी पार्श्वभूमी पाहता स्ट्रॉंग रूममधील ईव्हीएमच्या सुरक्षेसाठी पोलिस, निवडणूक प्रशासनासोबत राजकीय पक्षांनी स्वतःचीही यंत्रणा तैनात केली आहे.

-------------


दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि. १० डिसेंबर २०२५



## थोडक्यात

### सिंदफणा मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी अमर हबीब

शिरूर कासार । प्रतिनिधी




शिरूर कासार येथे दि. १६ ते १७ डिसेंबर रोजी होणाऱ्या सातव्या सिंदफणा मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक अमर हबीब यांची निवड करण्यात आली. किसानपुत्र आंदोलनाच्या माध्यमातून अमर हबीब यांनी भरीव काम केले असुन साहित्यिक चळवळीत सक्रीय त्यांचा सहभाग आहे.

सिंदफणा नदीच्या काठावर वसलेल्या शिरूर कासार शहरामध्ये एकलव्य विद्यालय येथे होणाऱ्या सातवे सिंदफणा मराठी साहित्य संमेलनात अनेक नामवंत साहित्यिक, विचारवंत, कवी, कथाकार, कलावंत येणार आहेत. ग्रामीण कथाकार भास्कर चंदनशीव साहित्य नगरी असे संमेलन स्थळाला नाव देण्यात आले आहे. परिसरातील शाळा, शिक्षक, शेतकरी यांचा सहभाग मोठ्या संख्येने राहणार आहे. दरम्यान मराठवाडा साहित्य परिषद शाखा अंबाजोगाईचे अध्यक्ष डॉ. राहुल धाकडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात कथाकार गोरख शेंद्रे यांनी अमर हबीब यांच्या अध्यक्षीय निवडीस अनुमोदन दिले. साहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव यांनी आयोजकांच्या वतीने सुचना मांडली. तसेच अमर हबीब यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी मराठवाडा साहित्य परिषद, छ. संभाजीनगरचे सदस्य दगडू लोमटे, प्रा. डॉ. शैलजा बरुरे, सतीश घाडगे तसेच कवी दत्ता वालेकर, पत्रकार गोकुळ पवार, सतीश मुरकुटे यांचेसह साहित्य रसिकजन उपस्थित होते.

### स्वामी विवेकानंद शाळेमध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

केज । प्रतिनिधी

जीवन विकास शिक्षण मंडळ केज आयोजित स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग केज या शाळेमध्ये स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या ७६ व्या जयंतीनिमित्त दि. १२ डिसेंबर २०२५ वार शुक्रवार रोजी सकाळी ठीक ९ ते २ या वेळेत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील रक्तदान शिबिराचे हे ३१ वे वर्ष आहे. या रक्तदान शिबिराचे काम केज येथील डॉ. श्रीकृष्ण नागरगोजे, रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी उपजिल्हा रुग्णालय केज व जिल्हा रुग्णालय बीड तसेच त्यांची टीम पाहणार आहे.



तरी बहुसंख्य रक्तदात्यांनी या रक्तदान चळवळीमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन जीवन विकास शिक्षण मंडळ केज तसेच स्वामी विवेकानंद विद्यामंदिर प्राथमिक व माध्यमिक विभाग, केज, स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल केज तसेच स्व. प्रमोद महाजन कनिष्ठ महाविद्यालय केज यांच्या वतीने करण्यात आले आहे.



**माजलगाव:– तेलगाव पुगणी येथील गणेश गुंदेकर यांची इंडियन आर्मीमध्ये निवड झाल्याबद्दल सत्कार करताना, शेतकरी कामगार पक्षाचे मध्यवर्ती सदस्य भाई ॲड. नारायणराव गोले पाटील, शिवसैनिक जयराम राऊत, शिवसेना सोशल मीडिया तालुका प्रमुख आकाश शिंदे, अभिषेक गुंदेकर व बबलू शेटे.**

# पीएम किसान योजनेतील पाटोदा तालुक्यातील ४३ संशयित लाभार्थ्यांची चौकशी सुरू

पाटोदा । प्रतिनिधी

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेत अपात्र असतानाही नियमांचे उल्लंघन करून लाभ घेतल्याच्या तक्रारी वाढल्याने शासनाने आता कडक पावले उचलली आहेत. पाटोदा तालुक्यातील अशा तब्बल ४३ संशयित शेतकऱ्यांची यादी तयार करण्यात आली असून त्यांच्या कागदपत्रांची पुनर्पडताळणी तसेच भौतिक तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

पीएम किसान योजना – महत्त्वाचे निकष

योजनेनुसार एका शेतकरी कुटुंबातील पती, पत्नी आणि अल्पवयीन मुलांपैकी फक्त एका व्यक्तीस लाभ घेता येतो. तसेच १ फेब्रुवारी २०१९ नंतर जमीन खरेदी, बक्षीसपत्र किंवा इतर कारणांनी ज्या शेतकऱ्यांच्या नावावर जमीन आली आहे, त्यांना या योजनेचा लाभ मिळत नाही. मात्र वारसा हक्काने मिळालेली जमीन यामध्ये वगळली जाते.

डेटा पडताळणीदरम्यान अनेक विसंगती उघड झाल्याने केंद्र शासनाने संशयित प्रकरणांमधील हप्ते तात्पुरते रोखले आहेत. विशेषतः –

एकाच कुटुंबातील पती–पत्नी दोघेही लाभ घेत असलेली प्रकरणे

जुना व नवा जमीनधारक दोघांच्या नावावर लाभ सुरू असलेली प्रकरणे

जमीन हस्तांतराचे कारण चुकीचे नोंदवलेली प्रकरणे

जुन्या जमीन धारकाची माहिती चुकीची आढळलेली प्रकरणे

अशा प्रकरणांवर कारवाई करण्यात येत आहे.

पाटोदा तालुक्यातील ४३ संशयित लाभार्थ्यांची यादी ग्रामपंचायतीत

पाटोदा तालुक्यातील या ४३ संशयित लाभार्थ्यांची यादी लवकरच संबंधित ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डावर लावण्यात येणार आहे. ज्यांच्या नावांचा यात समावेश आहे, त्यांनी स्वतःची पात्रता सिद्ध करण्यासाठी खालील कागदपत्रांसह तातडीने संपर्क साधावा–

पती–पत्नीचे आधार कार्ड

अद्यावत ७/१२ उतारा

सहा महिन्यांतील रेशनकार्डची प्रत

जमिनीच्या नोंदीतील फेरफार

मयत व्यक्ती असल्यास मृत्यू प्रमाणपत्र

संबंधित शेतकऱ्यांना ही कागदपत्रे घेऊन तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पाटोदा किंवा सहाय्यक कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

शासनाने दिलेल्या सूचनांनुसार आवश्यक पडताळणी पूर्ण झाल्यानंतरच पुढील हप्त्याबाबत अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.

## दिंद्रुडच्या केंद्रीय शाळेत विद्यार्थ्यांना ‘गुड टच-बॅड टच’ ओळखण्याचे धडे

दिंद्रुड । प्रतिनिधी

समाजात वावरताना नात्यागोत्यासह परक्यांनी आपल्या शरीराला होणारा स्पर्श कुठल्या भावनेतून होतो याची जाण व्हावी, यामुळे कुठलीही अनुचित घटना घडू नये यासाठी 'गुड टच–बॅड टच' ओळखण्यासाठी येथील जिल्हा परिषद केंद्रीय शाळेतील विद्यार्थ्यांना जनजागृती पर कार्यक्रमाचे आयोजन सिरसाळा येथील श्री. पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय व पोलिसांनी काल (दि०८) सोमवारी केले होते.



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. श्री. पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय व पोलीस स्टेशन सिरसाळा यांच्या माध्यमातून २५ नोव्हेंबर ते १० डिसेंबर या कालावधीत लिंगभेद हिंसाचार विरोधी उपक्रमांतर्गत समुपदेशनाचा पंधरवाडा राबवण्यात येत आहे. ठिकठिकाणी शाळेवर जाऊन मुला–मुलींना सुरक्षेबाबत धडे देण्यात येत आहेत. याच अनुषंगाने दिंद्रुड येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना प्रा.डॉ.उषा माने, छ.संभाजीनगर येथील शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयाच्या प्रा.सुषमा माने, दिंद्रुड पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार गणपती बुचाले, ईश्वर गंगावणे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष दादासाहेब वकरे, द्रोपदी शिवहार कटारे, मुख्याध्यापक मंचक सोळंके, पत्रकार संतोष स्वामी यांची प्रमुख उपस्थिती या प्रसंगी होती. गेल्या काही वर्षांपासून अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचाराच्या घटना वाढत आहेत. कौटुंबिक हिंसाचार, हुंडाबळी, लैंगिक अत्याचार, बलदंड मानसिकता आणि अल्पवयीन बालिकांवर होणारे घातक विकृत प्रकार या अनुषंगाने मुलींना सुरक्षेबाबत जनजागृती होणे काळाची गरज आहे. अल्पवयीन मुलींना यासाठी 'गुड टच–बॅड टच' बाबत माहिती असणे गरजेचे आहे. या अनुषंगाने विद्यार्थ्यांना सुरक्षेबाबत अनेक बाबींचे सखोल मार्गदर्शन उपस्थित मान्यवरांनी केले. मणिपूर, कोलकाता, सातारा, बदनापूर, मालेगाव, माजलगाव ची पुनरावृत्ती न होण्यासाठी विद्यार्थ्यांना सजग करण्यासाठी हा उपक्रम राबवत असल्याची माहिती प्रा.डॉ.उषा माने यांनी दिली. सूत्रसंचालन सहशिक्षक मनोहर कटारे तर आभार मीरा फपाळ यांनी मानले. प्रा. सुषमा माने यांनी आपल्या मार्गदर्शनात बालिका विद्यार्थिनींना समजेल अशा भाषेत व कृतीने जनजागृती करताना 'माझं शरीर माझा हक्क', 'आपला आवाज आपली ताकद' या ब्रीदवाक्यांची घोषणा देत मुलींचे दडपण कमी करण्याचा प्रयत्न केला. आपल्यासोबत काही अनुचित प्रकार घडत असल्यास आई–वडिलांसह आपल्या शिक्षकांच्या कानावर ही बाब घालण्यासाठी मुलींनी पुढे आले पाहिजे असे आवाहन केले. शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्रचंड प्रतिसाद दिला.

पान ६ वरुन...

### लेफ्टनंट रोहित भोरे

या कार्यक्रमाला प्रशांत गायकवाड, सरपंच बाळासाहेब घुले, शाहूराव टेकाळे, अण्णा शिंदे, प्रदीप काका जाधव, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मानिक सानप, व्यंकटेश नेमाने, भरत टेकाळे, अर्जुन भोरे, बाळासाहेब सानप आदींची उपस्थिती होती या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रानमारे सर यांनी केले. यावेळी गावातील संदीप भालेराव, एड. विशाल मस्के यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भरारी पथकाने बोगस

केला नाही. याबाबत वितरक कंपनीचे संचालक निखिल कासोळे यांना भ्रमणध्वनीद्वारे कृषि केंद्र चालक प्रतिनिधी राधेशाम काकडे यांनी विक्री केंद्रात बोलावून घेतले. निखिल कासोळे यांना सदरील खत कृषि गौरव फर्टिलायझर ता.नेवासा,जि.अहमदनगर यांचेकडून सिलीकॉन खत या नावाने खरेदी करून ते खत १०:२०:२० व २०:२०:०० या खताच्या बॅग भरून मे. काव्या ॲग्रो गेवराई यांना दुकानदारास दिले याबाबत लेखी खुलासा दिला. यानिमित्ताने जिल्ह्यात कुठेही विना परवाना, अनधिकृत कृषी निविष्ठा विक्री होत असल्यास जवळच्या कृषी कार्यालयात संपर्क साधावा असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

### लिंबागणेश परिसरात

पोखरी व पिंपरनई परिसरातील शेतकऱ्यांनी बिबट्यांचा वावर वाढल्याची माहिती दिल्याने भीतीचे वातावरण अधिक गडद झाले आहे. जिल्ह्यात बिबट्यांच्या हल्ल्यात पूर्वीही शेतकरी व ग्रामस्थ मृत्युमुखी पडल्याच्या घटना झाल्या असल्याने या परिस्थितीकडे दुर्लक्ष धोकादायक ठरू शकते. लिंबागणेश, पिंपरनई, पोखरी, बेलगाव, सोमनाथवाडी, मसेवाडी, मोरगाव, फुकेवाडी, काळेवाडी व गणेशनगर या भागांमध्ये रात्रीचा विद्युतपुरवठा थांबवून दिवसा नियमित व पुरेसा पुरवठा द्यावा, अशी ठाम मागणी शेतकरी व ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे केली आहे.

### बीड जिल्हा परिषदेची

असतांनाही सुमारे २५० कर्मचारी सध्या कार्यरत आहेत. अनेक कामासाठी येणाऱ्या अभ्यागताचे सोडा, मात्र दैनंदिन करत सिमेंट असलेल्या कर्मचाऱ्यांनाही साधे पिण्याचे पाणी जिल्हा परिषद पुरवू शकत नाही, शोकांतिका आहे. एक बिसलेरी बॉटल पाणी घ्यावे झाले तर रुपये २०/ खर्च होतो. तर २५० कर्मचाऱ्यांना दररोज ५०००/ रुपये पाण्यासाठी खर्चावे लागतात. जिल्हा परिषद प्रशासनाने कर्मचाऱ्यांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी अशी माफक अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

### गुंठेवारी करण्यासाठी

करणार आला.नगरपरिषद कार्यालय बीड चे अभिलेख कक्षासमोर मस्के यांच्या अंगझडतीत ओपो कंपनीचा मोबाईल हॅन्डसेंट व पाकीट त्या मध्ये रोख २१००रु मिळून आले. मस्के यांच्या घराची झडती घेण्यात आली.पोलीस ठाणे बीड शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकिया करण्यात आली या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक समाधान कवडे हे करीत आहेत. ही कारवाई पोलीस उप अधीक्षक सोपान चिटमपल्ले, पोनि राहुलकुमार भोळ, पोनि समाधान कवडे, सपोउपनि सुरेश सांगळे, पोलीस अंमलदार, पांडुरंग काचगुडे, अनिल शेळके, अमोल खरसाडे, संतोष राठोड, अविनाश गवळी, प्रदिप सुरवसे, राजकुमार आघाव, सचिन काळे, बिभीषण सांगळे, अंबादास पूरी गणेश म्हेत्रे यांनी कारवाई केली आहे.

### नगर परिषद कार्यालय

आली आहे. याच अनुषंगाने प्रशासनाने नगरपालिकेची संपूर्ण इमारत बंद केली होती. यामुळे सामान्य नागरीकांची घरपट्टी, नळपट्टी भरणे, पीटीआर संबंधी असलेली सर्व कामे खोळंबली होती. त्यामुळे नगर परिषद कार्यालय फाऊंडेशन स्कुल जवळ, नाथ चित्र मंदिर रोड वरील डॉ. भालचंद्र वाचनालयात हलविण्यात आले. नगरपालिकेच्या इमारतीत काही लोकांनी गोंधळ घालुन नगरपालिका कर्मचार्यांशी हुज्जत घातल्याने कार्यालय दैनंदिन कामासाठी बंद ठेवावे लागले होते. या तणावपूर्ण परिस्थितीत नागरीकांची कामे खोळंबु नयेत यासाठी सध्या रिकाम्या असलेल्या डॉ. भालचंद्र वाचनालयाच्या इमारतीत सोमवार दि. ०८ डिसेंबर पासून नगर परिषद कार्यालय सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे आता कार्यालयीन कामे सुरळीत होणार आहेत. नगर परिषद कार्यालय हे दि.२१ डिसेंबर पर्यंत हलविणार आहोत. त्र्यंबक कांबळे, मुख्याधिकारी, न.प. परळी यांनी सांगितले.

### प्रत्येक विद्यार्थी लोकशाहीतील

पध्दतीने हे दोन्ही प्रशिक्षण सत्र पार पाडले. यावेळी पुढे बोलतांना गटशिक्षणाधिकारी उजगरे म्हणाले की, सदरील प्रशिक्षणामधून न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधूता, जबाबदारी, वैज्ञानिक दृष्टिकोन, करुणा, राष्ट्रभक्ती, सेवाभाव व श्रमप्रतिष्ठा ही मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवली जाण्यासाठी व यासाठी अपेक्षित क्षमता विकसीत करण्यासाठी विविध अध्यापन तंत्रे मानसशास्त्रीय दृष्टिकोन व कृतीयुक्त अध्यापन प्रक्रिया कशी करावीत याबाबत मार्गदर्शन केले जात आहे. प्रचलित अध्ययन अध्यापन प्रक्रियेत परीक्षेतील संपादनूकीला महत्त्व असल्याने विद्यार्थ्यांची अभिव्यक्ती, कृती, परिसर भेटी यांचा अभाव आढळतो. मूल्यवर्धन प्रशिक्षणाच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या वैविध्यपूर्ण कृतींमुळे विद्यार्थ्यांमध्ये घरी व परिसरात वावरताना सामाजिक व भावनिक विकास होण्यास मोठी मदत होणार असून त्यांच्यामध्ये मूल्ये विकसनाला हातभार लागणार आहे. या मूल्यवर्धन प्रशिक्षणामध्ये दर्जेदार अभिनय गीतांचा समावेश केलेला असल्याने सदरील प्रशिक्षण हे अत्यंत रंजक व आनंददायी बनलेले आहे. परिणामी वर्ग अध्यापन करत असतांना आपल्या जिल्हा परिषद शाळांमध्ये देखील या अभिनय गीतांमुळे नवचैतन्य संचारले जाणार आहे. सदरील प्रशिक्षणात सहयोगी अध्ययन, सहयोगी खेळ, मुक्तोत्तरी व पाठपुराव्याचे प्रश्न, बहूवर्ग व बहूभाषिक वर्गांमध्ये मूल्यवर्धनाचे अध्यापन यांचा समावेश असल्याने सदरील प्रशिक्षण दर्जेदार बनलेले असून सर्व शिक्षकांनी सदरील प्रशिक्षण हे यशस्वीरित्या पूर्ण करुन या प्रशिक्षणाचा उपयोग आपल्या दैनंदिन अध्ययन अध्यापनात करण्याचे आवाहनही शेवटी बाबासाहेब उजगरे यांनी प्रशिक्षणार्थींना केले. या प्रशिक्षणाच्या यशस्वीतेसाठी मूल्यवर्धन प्रशिक्षणाची सर्व टीम, तसेच वडवणी गटशिक्षणाधिकारी कार्यालयातील सर्व साधन व्यक्ती, विषय तज्ञ व कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले.

## ऊस दरवाढीबद्दल आंदोलन केलेल्या युवा शेतकरी संघर्ष समितीला राष्ट्रीय चर्मकार महासंघाने केले सन्मानित

माजलगाव । प्रतिनिधी

गेल्या महिन्याभरापासून माजलगाव सह बीड जिल्ह्यामध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसाला रास्त भाव मिळवून देण्यासाठी युवा शेतकरी संघटनेच्या वतीने चक्काजाम आंदोलन करून उत्पादन खर्चाच्या प्रमाणामध्ये ऊसाला रास्त भाव मिळवून देण्यासाठी कारखाने बंद करून २७७५/प्रतिटन भाव जाहीर करून घेतला शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची रास्त किंमत मिळवून देणाऱ्या लढाव्या शेतकऱ्यांचा माजलगाव राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने डॉ ओमप्रकाश शेटे आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र राज्य प्रमुख व नितीन नाईकनवरे माजी सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती माजलगाव यांच्या हस्ते युवा शेतकरी संघर्ष समितीचे प्रमुख अजय राऊत,ड नारायण गोले पाटील,कॉम्रेड मोहनराव जाधव,नामदेव सोजे,नारायण तौर, जगदीश फरताडे, तुकाराम नावडकर, कृष्णा सोळंके,शुभम माने,भास्कर खांडे, योगेश कानडे,दिनकर चाळक,विजय दराडे,नितीन कचरे,सोनाजीराव नाईकनवरे,दिनकर रिंगणे,सतीशराव रिंगणे,अनिल राधे,योगेश कानडे, यांचा सत्कार व सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमाच्या वेळी ओमप्रकाश शेटे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये युवा शेतकरी संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे शेतकऱ्याच्या पिकाला योग्य भाव उपलब्ध करून दिल्याचे सांगत कौतुक करून मनःपूर्वक आभार व्यक्त केले व मी आपल्या संघर्ष समितीच्या पाठीशी असून भविष्य काळामध्ये होणाऱ्या आंदोलनात मी आपणास सर्व परी मदत करण्याचे आश्वासन त्यांनी दिले तसेच नितीन नाईकनवरे यांनी युवा शेतकरी संघर्ष समिती कार्यकर्त्यांस कोणत्याही क्षणी फोन लावा मी पाठीमागे उभा राहीन माला आदर आहे आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या



यावेळी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके व युवा जिल्हाध्यक्ष राजेश जाधव यांच्या संकल्पनेतून आयोजित केलेल्या सत्कार समारंभाला मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते यावेळी सुभाष कांबळे,गुड्डू खंडागळे,संतोष जाधव, राधाकिसन भाळशंकर,ॲड दत्ता जाधव, प्रसाद वाघमोडे,संतोष खंडागळे, प्रकाश आगवणे,विकास गायकवाड, आकाश कांबळे, प्रकाश कांबळे, बालासाहेब गवळी,सचिन वाघमारे, बंडू सोनवळे,नितीन कांबळे,सुरेश काजळे, रामभाऊ उदमले,शिवाजी पवार,भगवान कांबळे,बाळू पोहेकर,मयूर वाघमारे,कालिदास सोनवणे सह बहुसंख्येने चर्मकार बांधव उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जगताप यांनी केले.



## पत्रकार बोडखे, कदम, साबळे, शिक्षक ओटे, शिंदे यांचा सत्कार

कडा । प्रतिनिधी

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा आष्टी नं. १ या शाळेच्या वतीने राजमाता जिजाऊ माँसाहेब राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, पत्रकार अविनाश कदम, पत्रकार आण्णासाहेब साबळे आणि तसेच आदर्श शिक्षक पुरस्कारार्थी शिक्षक संदिप ओटे व शिक्षक देविदास शिंदे यांचा सोमवारी शाळेत सत्कार करण्यात आला.

मराठा सेवा संघ प्रणीत तानुबाई बिरजे पत्रकार परिषद, आष्टी यांच्या वतीने विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना राजमाता 'जिजाऊ माँसाहेब राज्यस्तरीय पुरस्कार' देण्यात येत आहेत. यांतर्गत पत्रकारिता पातळीवर ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम व दिव्यांग पत्रकार आण्णासाहेब साबळे यांना व शिक्षक क्षेत्रातून संदिप ओटे यांना हि पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल शाळेच्या वतीने फेटा बांधून, शालश्रीफळ देऊन गौरविण्यात आले. त्यांच्या पत्रकारितेतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल हा सत्कार करण्यात आला.तसेच याच प्रसंगी शिक्षक संदिप ओटे यांना हि पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल आणि शिक्षक देविदास शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचाही सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमात सेवानिवृत्त विस्तार अधिकारी सुरेश पवार, केंद्रप्रमुख त्रिंबक दिंडे, मुख्याध्यापक तयाराम गळगटे, शिक्षक राजेंद्र लाड, शिक्षक संपत एकशिंगे, शिक्षक बाळासाहेब तळेकर, श्रीकांत कारंडे, शिक्षिका ज्योती शिंदे, छबुबाई दहिफळे, ईला दंडवते, ज्योती शेगूळे, रेखा काळे, दिलशाद सय्यद,प्रतिभा हिंगे,इत्यादी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब तळेकर यांनी केले तर मुख्याध्यापक तयाराम गळगटे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. आभार प्रदर्शन श्रीकांत कारंडे यांनी केले.

## विद्यार्थीनींनी अंगभूत कौशल्य ओळखून करिअरची निवड करावी - प्रा.तंगलवाड

गेवराई । प्रतिनिधी

या स्पर्धेच्या युगामध्ये करिअरमध्ये यशस्वी होण्यासाठी विद्यार्थिनींनी आपल्यातील अंगभूत क्षमता व कौशल्य ओळखून त्यानुसार करिअरची निवड करावी. असे प्रतिपादन प्रा. डॉ. दिगंबर तंगलवाड यांनी केले. ते महिला महाविद्यालय, गेवराई येथील 'आजीवन शिक्षण व विस्तार विभाग' द्वारे आयोजित विद्यार्थी समुपदेशन, व्यवसाय मार्गदर्शन आणि प्लेसमेंट द्वि–दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटन म्हणून बोलत होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तात्याराम सोंडगे, आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. दत्ता तंगलवाड यांची व्यसपीठवर उपस्थिती होती.

विद्यार्थिनींना व्यवसाय मार्गदर्शन आणि करिअर निवडीसाठी आजीवन शिक्षण व विस्तार विभाग महत्त्वाची भूमिका बजावतो. त्या अनुषंगाने विभागाद्वारे विद्यार्थी समुदेशन, व्यवसाय मार्गदर्शन आणि प्लेसमेंट द्वि–दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेच्या उद्घाटनासाठी महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय विद्यापीठ, वर्धा येथील प्रा. डॉ. दिगंबर तंगलवाड हे उद्घाटक म्हणून उपस्थित होते. यावेळी बोलताना ते म्हणाले की, सध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. या स्पर्धेच्या युगामध्ये विद्यार्थ्यांवर करियर विषयीचा दबाव असतो. त्यामुळे आपल्यातील अंगभूत क्षमताचा विचार करून करीअर निवडावे. त्यासाठी महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार विभाग महत्त्वाची भूमिका पार पाडतो. कार्यशाळेच्या द्वितीय सत्रामध्ये



व्यक्तिमत्व विकास या विषयावर बोलताना प्रा. डॉ. दिगंबर तंगलवाड यांनी व्यक्तिमत्व म्हणजे काय? व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक गोष्टी यावर सविस्तर असे मार्गदर्शन केले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तात्याराम सोंडगे हे होते.

या द्वि–दिवशी कार्यशाळेमध्ये मध्ये सावरकर महाविद्यालय, बीड येथील प्रा. डॉ. रमेश खंडागळे यांनी 'संवाद कौशल्य' या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना ते म्हणाले की जीवनात यशस्वी होण्यासाठी संवाद कौशल्य अति आवश्यक आहे. दोन मित्रांमधील संवादापासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत चा संवाद या सर्वासाठी संवाद कौशल्य उपयोगी आहे. त्यामुळे करिअरमध्ये यशस्वी होण्यासाठी संवाद कौशल्य आत्मसात करावे. या सत्राच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या उप प्राचार्य डॉ. संगीता आहेर या होत्या. त्या म्हणाल्या की, सुसंवाद हा माणूस जोडून कार्य पूर्ण करतो तर विसंवाद हा माणूस तोडून कार्य बिघडवतो. म्हणून विद्यार्थीनींनी सुसंवादी असले पाहिजे. कार्यशाळेच्या चतुर्थ सत्रामध्ये शारदा विद्यामंदिर, गेवराई येथील मुख्याध्यापक श्री. मुरलीधर पवार यांनी 'स्पर्धा परीक्षा व व्यवसाय मार्गदर्शन' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी स्पर्धा परीक्षेमधील विविध संधी सांगून विविध व्यवसाय क्षेत्रांची माहिती विद्यार्थीनींना दिली. अध्यक्षीय समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तात्याराम सोंडगे म्हणाले की, करियर मध्ये यशस्वी होण्यासाठी वास्तववादी असणे आवश्यक आहे. आणि विद्यार्थीनींमध्ये वास्तववादी दृष्टिकोन विकसित करण्यासाठी महाविद्यालयाचा 'आजीवन शिक्षण व विस्तार विभाग' महत्त्वाची भूमिका पार पाडतो.

या द्वी–दिवशीय कार्यशाळेमध्ये महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक–शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती. ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील प्रा. डॉ. संदिपान किवणे, प्रा. डॉ. नामदेव शिनगारे, प्रा. डॉ. रामहरी काकडे, प्रा. डॉ. कैलास सावंत, प्रा. डॉ. राजाभाऊ चव्हाण, प्रा. डॉ. शिवाजी दिवाण, प्रा. डॉ. संजय तळतकर, प्रा. डॉ. संजय भेदेकर, प्रा. रविंद्र चौधरी, प्रा. गोकुळदास कदम, प्रा. बाबु वादे, श्री. गोविंद कापरे व श्री. एकनाथ राठोड यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

# धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टीचे 1 हजार २७८ कोटी रुपये वितरित

धाराशिव : यंदा महाराष्ट्रात तुफान पाऊस पडला. खास करून मराठवाडा आणि विदर्भात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाली. शेतकऱ्यांचं उभं पीक पाण्याखाली गेलं, घरे वाहून गेली, गुरे वाहून गेली. होत नव्हतं ते सगळं मातीमोल झालं. आधीच आर्थिक संकटात असलेला बळीराजा पावसामुळे पुरता हवालदिल झाला. सरकारने या शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी ३२ हजार कोटींची आर्थिक मदत जाहीर केली. आता धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा देत सरकारकडून अतिवृष्टीचे १ हजार २७८ कोटी रुपयांचे अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

भाजपचे आमदार राणा जगजीतसिंह पाटील यांनी याबाबतची माहिती दिली आहे. शासनाच्या नवीन निकषांनुसार ३ हेक्टर मर्यादेपर्यंतच्या नुकसान भरपाईसाठीही अनुदान उपलब्ध होणार आहे. परंतु शेतकऱ्यांना ई-केवायसी प्रक्रिया अनिवार्य आहे. शेतकऱ्यांनी केवायसी तात्काळ पूर्ण करण्याचे आवाहन देखील करण्यात आले आहे. अतिवृष्टीचा



मोठा फटका धाराशिवला सुद्धा बसला होता. अनेक ठिकाणी जमीन वाहून गेली. पीक पाण्यात वाहून गेलं, शेतकरी अक्षरशः आक्रोश करत होता. आता सरकारने या अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात १ हजार २७८ कोटी वितरित केले आहेत. एकूण ९ लाख ७६ हजार ८२५ शेतकऱ्यांच्या खात्यांवर हि रक्कम जमा करण्यात आली असून यामुळे अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. दरम्यान, ३० जूनपर्यंत शेतकऱ्यांची कर्जमाफी करणार आहोत असं आश्वासन सरकार कडून देण्यात आलं आहे. तसेच यावेळी कर्जाच्या रकमेची कोणतीही मर्यादा नाही. या वेळेस कर्जमाफी 'मर्यादारहित' करण्याचा निर्णय शेतकऱ्यांच्या मागणीवर आधारित आहे. कोणतीही रकमेची मर्यादा आता राहणार नाही. त्यासाठी जिल्हानिहाय कर्जाची माहिती मागवण्यात आली असून संपूर्ण कर्जमाफीचे प्रस्तावित आराखडे तयार केले जात आहेत. प्रवीण परदेशी यांची समिती एक एप्रिल पर्यंत अहवाल सरकारकडे पाठवेल. या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात राज्य सरकार ३० जूनपूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार आहे अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

## सोयाबीन उत्पादकांसाठी महत्वाचा निर्णय; हमीभावाने खरेदीच्या मर्यादेत वाढ



पुणे : हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी कृषी विभागाने वाढीव सुधारित उत्पादकता जाहीर केली आहे. पण केंद्राकडून १८ लाख ५० हजार टन उद्दीष्टाला मंजुरी मिळून दीड महिना झाला, पण सोयाबीन खरेदीला वेग आलेला नाही. आतापर्यंत केवळ ६५ हजार टनांचीच खरेदी झाली आहे. त्यामुळे जास्तीत जास्त केंद्र सुरु होऊन खरेदीची गती वाढली तरच शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

हमीभावाने सोयाबीन खरेदीची हेक्टरी मर्यादा कमी असल्याची तक्रार शेतकरी करत होते. यंदा ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात बहुतांशी जिल्ह्यांमध्ये पावसाने सोयाबीन पिकाचे मोठे नुकसान केले होते. पिकांची प्राथमिक उत्पादकता कमी आल्याचे पीक कापणी प्रयोगातून सिध्द झाले होते. पण अनेक शेतकऱ्यांची उत्पादकता सरासरी उत्पादकतेपेक्षा अधिक होती. त्यामुळे या शेतकऱ्यांना उरलेले सोयाबीन खुल्या बाजारात कमी भावाता विकावे लागत आहे. प्रत्यक्ष उत्पादन खरेदी मर्यादेपेक्षा जास्त असल्याने मर्यादा वाढविण्याची मागणी होती. दुसरीकडे मात्र सोयाबीन खरेदीचा गोंधळ अजूनही संपलेला नाही. केंद्र सरकारने राज्याच्या मागणीनुसार १८ लाख ५० हजार टनांचे उद्दीष्ट दिले आहे. पण खरेदीची गती संथ आहे. आतापर्यंत केवळ ४६१ खरेदी केंद्रावरच खरेदी सुरु आहे. तर २.८८ लाख शेतकऱ्यांकडून ६५ हजार टन खरेदी करण्यात आली आहे. सोयाबीन खरेदीची गती वाढली तरच वाढवलेल्या खरेदी मर्यादेचा फायदा शेतकऱ्यांना होईल. अन्यथा खरेदीची वाट पाहून खुल्या बाजारातच सोयाबीन विकण्याची वेळ शेतकऱ्यांवर येणार आहे. राज्याच्या कृषी विभागाने सुधारित उत्पादकता जाहीर करत वाढ केली आहे. हेक्टरी ३ ते १० क्विंटलपर्यंत उत्पादकता वाढली आहे.

## या पद्धतीने पालक लागवड केल्यास मिळेल जास्त उत्पादन

पालक हे एक लोकप्रिय भाजीपाला पीक असून कमी कालावधीतचांगले उत्पन्न या पिकाच्या माध्यमातून मिळते. पालक हे एक औषधी गुणांनी युक्त असे भाजीपाला पीक आहे.जर आपण व्यवस्थित व्यवस्थापन आणि नियोजन करून जर पालकांचे उत्पादन घेतले तर चांगला फायदा होतो.

जमिन आणि हवामान : पालकाचे पीक हे वेगवेगळ्या प्रकारच्या जमिनीमध्ये घेता येते. अगदी खारवट असलेल्या जमिनीमध्ये सुद्धा पालक पिकघेता येते. पालक हे हिवाळी पीक आहे. पालक हे पीक अत्यंत कमी कालावधीत येते. आपल्याकडे कडक उन्हाळ्याचे दोन महिने वगळता सर्व महिन्यांमध्ये पालक पीक घेता येते. जास्त तापमानामध्ये जर पालकचे पीक घेतले तर त्याचा दर्जा घसरतो.

पालकाची लागवड : पालकच्या भाजीचा सतत पुरवठा करता यावा यासाठी १० ते १५ दिवसांच्या अंतराने टप्प्याटप्प्याने बियांची पेरणी करावी. पालक लागवडीसाठी सपाट वाफ्याचा वापर करणे फायदेशीर ठरते. त्यानंतर बिया फोकून पेरणी करावी. त्यानंतर बिया मातीत पेरून त्यावर हलके हलके पाणी द्यावे. २ बिया यांमधील अंतर पंचवीस ते तीस सेंटिमीटर ठेवावे. दाट लागवड करू नये.वालाची लागवड तर दाट झाली तर पिकाची वाढ पूर्णपणे होत नाही. २५ ते ३० किलो बियाणे



प्रति हेक्टर लागते.

खते आणि पाणी व्यवस्थापन : पालक पिकासाठी नत्राचा पुरवठा जास्त प्रमाणात करावा लागतो. जमिनीत ओलावा असणे गरजेचे असल्यामुळे नियमित पाण्याचा पुरवठा करावा. पालक पिकासाठी जमिनीला जवळ-जवळ २० गाड्या शेणखत, ४० किलो स्फुरद, ४० किलो पालाश आणि ८० किलो नत्र देणे गरजेचे आहे. शेणखत हे पूर्वमशागत करताना जमिनीत मिसळून द्यावे. पालकच्या पानांना हिरवेपणा यावा आणि उत्पादनात चांगली वाढ व्हावी यासाठी बी उगवल्यानंतर पंधरा दिवसांनी आणि कापणीनंतर दीड टक्का युरिया फवारावा. पिकाला नियमित पाणी द्यावे. हिवाळ्यामध्ये लागवड केली असेल तर पाणी देताना दहा ते पंधरा दिवसांचा गॅप द्यावा. पिकाची काढणी करण्याच्या दोन ते तीन दिवस अगोदर पिकाला पाणी द्यावे. पालक बियांची लागवड केल्यानंतर लगेचच पाणी द्यावे.पालकची काढणी : पालक पेरणीच्या एका महिन्यानंतर पीक कापणीला तयार होते. कापणी करीत असताना खराब पालक वेगळी काढावी. पालकाची व्यवस्थित जुडी बांधून घ्यावी. जुळ्या व्यवस्थित जागेत तर असून त्यावर कापड झाकून किंवा बांबूच्या टोपल्यात किंवा पोत्यात ठेवाव्यात. टोपलीच्या खाली किंवा वर कडुनिंबाचा पाला ठेवला तर पालक लवकर खराब होत नाही. पालकच्या जुड्यांवर जास्त प्रमाणात पाणी मारू नये अन्यथा पालक खराब होऊ शकते. पालकचे उत्पादन : १० ते १५ टनपर्यंत हेक्टरी उत्पादन होते. तसेच बियाण्याचे उत्पादन दीड टन पर्यंत मिळू शकते.

# रब्बी हंगामासाठी राजमा लागवड तंत्रज्ञान

राजमा हे पीक घेवडा, श्रावणी घेवडा, फरसबी अशा वेगवेगळ्या नावांनीही ओळखले जाते. याचे हिरवे कोवळे दाणे, सोललेल्या शेंगांची भाजी आणि वाळलेल्या दाण्यांच्या भाजीलाहा आहारामध्ये पसंती दिली जाते. यामध्ये प्रथिनांचे प्रमाण २२ टक्के असून, यासोबतच जीवनसत्त्वे व खनिजे मुबलक प्रमाणात आढळतात. या पिकाचा कालावधी अत्यंत कमी (७०-८० दिवस) असून, वर्षभर या पिकाची लागवड करणे शक्य आहे. परिणामी, या पिकाच्या लागवडीकडे शेतकऱ्यांचा कल वाढत आहे. ईशान्य भारतात सिक्कीम, मेघालय, आसाम या राज्यांत शेतासोबतच परसबागेतही राजमा लागवड केली जाते. त्यामुळे रोजच्या भाज्यांसाठी हिरव्या शेंगाची उपलब्धता होते. आपल्या राज्यामध्ये प्रामुख्याने राजमा लागवड ही वाळलेल्या दाण्यासाठी केली जाते.

पेरणीची वेळ : जानेवारी ते फेब्रुवारी. प्रामुख्याने ऑगस्ट ते सप्टेंबरची सुरुवात. मात्र राज्यामध्ये खरिपाची पिके निघाल्यानंतर रब्बी पीक म्हणून ऑक्टोबर - नोव्हेंबरमध्येही अनेक जण लागवड करतात.

लागवडीसाठी वाण : फुले मुठा (एचपीआर-३५) व फुले वरुण (राहुरी कृषी विद्यापीठाचे वाण), जीआर-१ व व्हीएल -६३ (गुजरातचे वाण), पुसा पार्वती, पुसा कोमल, पुसा सुकोमल, वाळलेल्या दाण्यासाठीचे वाण आणि वेलवर्गीय पिकासाठी म्हणजेच हिरव्या दाण्यांच्या शेंगांसाठी 'केंचुकी वंडर' यासारखे वाण लागवडीसाठी वापरता येतात.

जमिनीची निवड : सर्वच प्रकारच्या जमिनीत लागवड शक्य. मात्र जमिनीचा सामू ६.० ते ७.० च्या दरम्यान असावा. भारी काळ्या जमिनींमध्ये चांगले उत्पादन येते. पावसाचे अथवा ओलिताचे पाणी साचून राहणाऱ्या (म्हणजेच पाण्याचा योग्य प्रकारे निचरा न होणाऱ्या) जमिनीत या पिकाची लागवड करू नये. उत्पादनात मोठी घट संभवते.

मशागत : जमीन तयार करताना खोल नांगरट



करूनच जमिनीच्या मशागतीची सुरुवात करावी. एकरी २ टन चांगले मुरलेले व कुजलेले शेणखत शेवटच्या वाहीपूर्वी द्यावे.

बियाणे प्रमाण : प्रचलित पद्धतीने ३५ ते ४० किलो प्रति एकर. सरी वरंबा पद्धत अथवा गादीवाफ्यावर जोडओळीत, तीन ओळींत अथवा चार ओळींत लागवडीनुसार बियाणे त्या त्या प्रमाणात कमी अधिक लागेल.

बीजप्रक्रिया : थायरम २ ग्रॅम अधिक कार्बेन्डाझिम २ ग्रॅम प्रति किलो बियाणे.

पेरणीचे अंतर : प्रचलित पद्धत व सुधारित पद्धत : ३०-४५ सेंमी दोन ओळींतील अंतर व १०-१५ सेंमी दोन झाडांतील अंतर वेलीवर्गीय वाणासाठी ६०-७५ सेंमी १५-२० सेंमी. हिरव्या शेंगांसाठी राजम्याचे वेलवर्गीय वाण लावायचे असल्यास, झाडांचे वेल चढण्यासाठी बांबूचे मंडप तयार करावेत. सुतळीने बांधून वेल मंडपावर चढवावेत. आपला गादीवाफा किंवा वरंब्याच्या रुंदीप्रमाणे मंडपाची रचना असावी. यासाठी एकरी बियाणे सुमारे १२ ते १५ किलो लागेल.

ओलीत व्यवस्थापन : राजमा कमी कालावधीचे पीक आहे. त्यात हंगामनिहाय पेरणीच्या वेळेनुसार ओलीत व्यवस्थापन करावे लागते. सर्वसाधारण परिस्थितीत शेत तयार झाल्यानंतर स्पिंकलरद्वारे संपूर्ण शेत भिजवून घ्यावे. त्यानंतर वाफसा आल्यावर लागवड अथवा पेरणी करावी. उगवण झाल्यावर रोपट्याची सुरुवातीची अवस्था असताना हलके ओलित द्यावे. स्प्रिंकलर चालू ठेवण्याचा कालावधी अर्ध्यापर्यंत कमी करावा. यानंतर कळ्या अवस्थेपूर्वी ओलीत करावे. त्यानंतर शेंगामध्ये कोवळे दाणे असताना ओलित करावे. ठिंबक प्रणालीद्वारे लागवड असल्यास जेव्हा - जेव्हा गरज भासेल त्या वेळी सिंचन द्यावे.

अन्नद्रव्यांची मात्रा : पेरणीवेळी १२ किलो नत्र : ३२ किलो स्फुरद : १२ किलो पालाश (आवश्यक असल्यास) प्रति एकर (डीएपी सव्वा बॅग व म्युरेट ऑफ पोटॅश अर्धा बॅग). पीक २० दिवसांचे असताना - १२ किलो नत्र प्रति एकर (२० किलो युरिया प्रति एकर)

तण व्यवस्थापन : दाण्यासाठीच्या राजमा पिकाची फार जास्त व उंच वाढ होत नाही. यामुळे तण व्यवस्थापनाच्या दृष्टीने सुरुवातीचे ३०-३५ दिवस अत्यंत महत्त्वाचे असतात. त्यासाठी प्रचलित पद्धतीने लागवड असल्यास पीक १८ ते २० दिवसांचे असताना पहिली व २५-२८ दिवसांचे असताना दुसरी कोळपणी लहान कोळप्याने करावी. ओळीतील तणांसाठी हाताने खुरपणी पहिल्या कोळपणीनंतर करून घ्यावी. वरंबा सरी पद्धत अथवा गादीवाफा पद्धतीमध्ये खुरपणीद्वारे तणनियंत्रण करावे.

पीक संरक्षण : राजमा पिकावर प्रामुख्याने शेंगा पोखरून दाणे खाणारी अळी, मावा, शेंगांवरील भुंगा या किडींचा आणि मूळसड, पानांवरील व शेंगांवरील ठिपके, दहीया या रोगांचा प्रामुख्याने प्रादुर्भाव होतो. त्यासाठी शिफारस आणि आवश्यकतेनुसार फवारणीचे नियोजन करावे.

काढणी व्यवस्थापन : राजमा दाण्यांसाठीचे पीक ७० ते ८० दिवसांत पक्व होते. त्यामुळे पक्व झालेल्या शेंगा २ ते ३ वेळा मजुरांद्वारे तोडाव्या लागतात. प्रति एकरी ८ ते १० क्विंटल उत्पादन मिळते. पारंपरिक टोकणीच्या तुलनेमध्ये वरंबा सरी अथवा गादीवाफा पद्धतीने टोकण केल्यास उत्पादनात लक्षणीय वाढ होते.

आंतरपीक :उसामध्ये हंगामानुसार आंतरपीक म्हणून राजमा पिकाचा समावेश करता येईल. उसाची सऱ्यांमध्ये लागवड झाल्यानंतर, वरंबाच्या पृष्ठभागावर, वरंबाच्या पृष्ठभागाच्या रुंदीनुसार जोडओळीत अथवा तीन ओळी राजमा पिकाच्या घेता येतील. यासाठी वरंब्याचा पृष्ठभाग मजुरांच्या साह्याने सपाट करून घ्यावा. ते लागवडीसाठी अधिक सोयीचे ठरते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७९९ : ला जगात सर्वात आधी फ्रांसने आजच्या दिवशी मेट्रिक सिस्टम चा उपयोग केला.
१८६८ : पॅलेस ऑफ वेस्टमिन्स्टर, लंडन येथे पहिले वाहतुक नियंत्रक दिवे बसवण्यात आले. सुरुवातीला हे रेल्वेच्या सिग्नल्स सारखे होते आणि रात्री प्रकाशित करण्यासाठी लाल व हिरव्या रंगाच्या गॅसच्या दिव्यांचा वापर करण्यात येत असे.
१८८७ : ला आस्ट्रिया, हंगरी, इटली और ब्रिटेन या देशांनी बाल्कन सैन्य करारावर सह्या केल्या.
१९०१ : नोबेल पारितोषिकांचे प्रथमच वितरण करण्यात आले.
१९०२ : तस्मानिया मध्ये आजच्या दिवशी महिलांना मतदान करण्याचा अधिकार मिळाला.
१९०२ : कर्नाटक चे माजी मुख्यमंत्री एस. निजलिंगप्पा यांचा जन्म.
१९०३ : पियरे क्यूरी और मैरी क्यूरी यांना भौतिक शास्त्रातील नोबल पुरस्कार मिळाला.
१९०६ : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष थिओडोर रुझवेल्ट यांना नोबेल शांति पुरस्कार देण्यात आला. नोबेल पारितोषिक मिळवणारे ते पहिले अमेरिकन होत.
१९१६ : 'संगीत स्वयंवर' या संगीत नाटकाचा पहिला प्रयोग झाला.
१९४८ : मानवी हक्क दिन.
१९६२ : ला नोबेल पुरस्कार विजेता अल्बर्ट लूथली यांनी दक्षिण आफ्रिकी मध्ये वर्णभेद समाप्त करण्याची अपील केली.
१९७८ : ईस्त्रायलचे अध्यक्ष मेनाकेम बेगिन आणि सीरीयाचे अध्यक्ष अन्वर सादात यांना संयुकतपणे नोबेल शांति पुरस्कार प्रदान करण्यात आला.
१९९८ : अर्थशास्त्र मध्ये नोबेल पारितोषिक अर्थतज्ञ प्रा. अमर्त्य सेन यांना प्रदान.
२००० : ला पाकिस्तान च्या माजी प्रधानमंत्री नवाज शरीफ यांना पाकिस्तान मधून १० वर्षासाठी हद्दपार करण्यात आले.
२००२ : ला अमेरिकेची दुसरी सर्वात मोठी विमान कंपनी यूनाइटेड एयरलाइंस पूर्णपणे कंगाल घोषित करण्यात आली.
२००३ : भारतीय क्रिकेटपटू सचिन तेंडूलकर यांनी कसोटी क्रिकेट मध्ये वे३५ शतक केले.
२००४ : ला अनिल कुंबळे ने कपिल देव ला मागे टाकत कसोटी सामन्यात सर्वात जास्त विकेट घेणारे पहिले भारतीय बनले.
२००८ : प्रा. अमर्त्य सेन यांना अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक बहाल करण्यात आले.
२०१४ : भारताचे कैलाश सत्यर्थी आणि पाकिस्तानची मलाला युसुफझाई यांना संयुकतपणे नोबेल शांति पुरस्कार प्रदान करण्यात आला.
२०१५ : सालमन खान यांना सदोष मनुष्यवधाच्या आरोपातून निर्दोष मुक्तता.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७० : सर यदुनाथ सरकार - औरंगजेबाचे पाच खंडात विस्तृत चरित्र लिहिणारे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे इतिहासकार (मृत्यू: १९ मे १९५८)
१८७८ : चक्रवर्ती राजगोपालाचारी - भारताचे शेवटचे गव्हर्नर जनरल, मद्रास इलाख्याचे मुख्यमंत्री, स्वातंत्र्यसेनानी, कायदेपंडित, मुत्सद्दी आणि लेखक (मृत्यू: २५ डिसेंबर १९७२)
१८८० : डॉ. श्रीपाद कृष्ण बेलवलकर - प्राच्यविद्यातज्ञ, संस्कृत पंडित. अमेरिकेच्या हॉर्वर्ड विद्यापीठात भवभूतीच्या उत्तर रामचरितावर प्रबंध लिहून त्यांनी डॉक्टरेट मिळवली. (मृत्यू: ८ जानेवारी १९६७ पुणे)
१८९२ : व्यंकटेश बळवंत ऊर्फ बापूराव पेंढारकर - रंगभूमीवरील अभिनेते व गायक (मृत्यू: १५ मार्च १९३७)
१९०८ : पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित तसेच पुरातत्व विज्ञान मध्ये तज्ञ असलेले हसमुख धीरजलाल संकलीया यांचा जन्म.
१९०८ : भारतीय पुरातत्वावेत्ते हसमुख धीरजलाल सांकलिया यांचा जन्म.
१९५७ : भारतीय-अमेरिकन गुरू आणि शिक्षक प्रेमा रावत यांचा जन्म.
१९६० : भारतीय चित्रपट सृष्टीच्या अभिनेत्री रती अग्निहोत्री यांचा जन्म.
१९८८ : भारतीय क्रिकेट खेळाडू धवल कुलकर्णी यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८९६ : अल्फ्रेड नोबेल - स्वीडीश संशोधक आणि नोबेल पुरस्कारांचे प्रणेते (जन्म: २१ आक्टबर १८३३)
१९२० : होरॅस डॉज - 'डॉज मोटर कंपनी'चे एक संस्थापक (जन्म: १७ मे १८६८)
१९५३ : भारतीय-इंग्रजी विद्वान आणि अनुवादक अब्दुल्ला यूसुफ अली यांचे निधन. (जन्म: १४ एप्रिल १८७२)
१९५५ : आचार्य शंकर दत्तात्रेय जावडेकर - लेखक व गांधीवादी तत्त्वचिंतक (जन्म: २६ सप्टेंबर १८९४)
१९६४ : शंकर गणेश दाते - ग्रंथसूचीकार (जन्म: १७ ऑगस्ट १९०५)
१९६३ : सरदार कोवालम माधव तथा के. एम. पणीक्कर - भारताचे चीन, इजिप्त आणि फ्रान्समधील राजदूत, इतिहासपंडित (जन्म: ३ जून १८९५)
१९६३ : आफ्रिकी देश झांझिबार यांनी आजच्या दिवशी ब्रिटन पासून स्वतंत्र घोषित केले.
१९९२ : भारताच्या गुजरात मध्ये पहिली होवरक्राफ्ट सेवा सुरु झाली.
१९९४ : यासिर अराफात, यित्जाक रॉबिन आणि शिमोन पेरेज यांना नोबेल शांती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
१९९५ : स्वातंत्र्य सैनिक चौधरी दिगंबर सिंह यांचे निधन.
१९९९ : क्रोएशिया देशाचे पहिले अध्यक्ष फ्रांजो तुममन यांचे निधन. (जन्म: १४ मे १९२२)
२००१ : अशोक कुमार गांगूली ऊर्फ 'दादामुनी' - चित्रपट अभिनेते, पद्मश्री (१९६२), दादासाहेब फाळके पुरस्कार (१९८९), ५३ वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत सुमारे ४०० चित्रपटांत भूमिका केल्या (जन्म: १३ आक्टबर १९११)
२००३ : श्रीकांत ठाकरे - संगीतकार
२००९ : दिलीप पुरुषोत्तम चित्रे - लेखक, कवी आणि टीकाकार (जन्म: १७ सप्टेंबर १९३८)

राज्य लोकतंत्र मराठवाडा वृत्तांत
बुधवार दि.१० डिसेंबर २०२५ ५

## थोडक्यात



### विद्यार्थ्यांच्या कला गुणांना संधी मिळते -रामेश्वर रेंगे

जालना। प्रतिनिधी

विद्यार्थी हे अभ्यासात हुशार असतातच, मात्र त्यांच्या अंगात कोणती कला आहे. यासाठी सर्वांनी आपल्या पाल्याला वर्षातून एकदा संपन्न होणाऱ्या वार्षिक स्नेहसंमेलनामधे सहभागी नक्की होऊ द्या. त्यामुळे त्यांच्या अंगात असलेल्या कला गुणांना वाव मिळेल असे मत उपविभागीय पोलिस अधिकारी रामेश्वर रेंगे यांनी व्यक्त केले. ते न्यू वंडर कि इंग्लिश स्कूल व कनिष्ठ विद्यालय, परतूर यांनी आयोजित केलेल्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उदघाटन प्रसंगी बोलत होते. यावेळी नारायणराव सोळंके, गणेशराव सोळंके, सचिव छाया बागल, संतोष झरेकर, निवृत्ती बिडवे, ॲड. प्रवीण चव्हाण, सुरेश मोठे, विष्णजी ढवळे,

गोविंद पाठक, वचिष्ठ गुरु सोळंके उपस्थित होते. रेंगे म्हणाले की, या संस्थेचे हा दहावे वार्षिक स्नेह संमेलन आहे. शाळेने याआधीचे सर्व स्नेह संमेलने उत्कतुष्ठ केलेले आहेतच. अशा संमेलनामधूनच गायक, अभिनेता, डान्सर निर्माण होत असतात. त्यामुळे पालकांनी आपला मुलगा किंवा मुलींना अशा कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, असेही ते म्हणाले. याप्रसंगी जुनिअर केजी, सिनिअर केजीच्या लहान-लहान बालकांनी तसेच इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंतच्या अनेक विद्यार्थ्यांनी नृत्य, नाटक व गायनामध्ये २०५ विध्यार्थी व २०० विद्यार्थिनींनी सहभागी होऊन कला सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

### संत संताजी जगनाडे महाराज यांना अभिवादन



जालना। प्रतिनिधी

संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. प्र.अपर जिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी नायब तहसीलदार सतिश तायडे, दिपाली वानखेडे, रविंद्र हेलगट, संपदा कुलकर्णी, मिनाक्षी देवशी, मिना नगरकर, सविता भोकरे, सुनिल काळुंके यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते.

### अहिल्यानगर शहरात एलसीबीचा मोठा छापा

अहिल्यानगर। प्रतिनिधी

केडगाव बायपास परिसरातील अनुराज टायर गोदामात सुरू असलेल्या अवैध गॅस रिफिलिंग सेंटरवर एलसीबीने छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी एचपी कंपनीचा गॅस टँकर, २५ व्यावसायिक सिलेंड, टेम्पो आणि रिफिलिंगचे साहित्य असा एकूण ४१ लाख २६ हजार ३३९ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने रविवारी रात्री छापा टाकला. टँकरमधून विनापरवाना आणि अत्यंत धोकादायक पद्धतीने व्यावसायिक टाक्यांमध्ये गॅस भरण्याचे काम सुरू असल्याचे यावेळी निष्पन्न झाले.

पोलिसांनी घटनास्थळावरून लातूर, बुलढाणा, पश्चिम बंगाल आणि स्थानिक भागातील चार आरोपींना ताब्यात घेतले.याप्रकरणी मालक राजू साबळे याच्यासह इतर पाच जणांविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भरवस्तीत ज्वलनशील पदार्थांची निष्काळजीपणे हाताळणी करून जनसामान्यांच्या जीविताला धोका निर्माण केल्याबद्दल बीएनएस आणि जीवनावश्यक वस्तू कायद्याच्या विविध कलमान्वये ही कारवाई करण्यात आली आहे

कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, आष्टी यांचे कार्यालय
(दंड - विभाग ) ता. आष्टी जि.बीड
Email-id tahsildarashti@gmail.com
दूरध्वनी. क्र.- (०२४४१) २८२५४२
क्र.२०२५/दंड. विभाग/जन्म-मृत्यू/कावी-७४ दि.०५/१२/२०२५

जाहीरनामा

जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत.

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११(३) अन्वये

सर्व जनतेस मौजे इमनगाव ता. आष्टी. जि. बीड यांना जाहीर केले जाते कि, अर्जदार, नामे, विवेक भरत नखाते रा. इमनगाव ता. आष्टी जि.बीड यांनी त्यांचे मुलगा नामे, हर्षवर्धन विवेक नखाते जन्म दि. २३/०२/२०१३ रोजी मौजे. इमनगाव ता. आष्टी जि.बीड येथे झाला असुन अर्जदारास सदरहू जन्म ची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करीता सदरहू अर्जदाराचे यांची स्वतः यांचे कायदेशीर जन्म दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०८/१२/२०२५ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

आदेशावरून
स्वाक्षरीत/-
कार्यकारी दंडाधिकारी
तहसीलदार आष्टी

# कला केंद्रातील नर्तिकेसाठी युवकाने उचलले टोकाचे पाऊल

धाराशिव। प्रतिनिधी

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी आणि बीड जिल्ह्यातील गेवराई येथे नर्तिकेच्या नादातून युवकाने आपलं जीवन संपवल्याची धक्कादायक घटना घडली होती. त्यानंतर, आता धाराशिवमध्ये कला केंद्रातील महिलेसोबत प्रेमसंबंधातून वाद झाल्याने तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. अश्रुबा कांबळे असं मृत युवकाचं नाव असून दोघेही एकत्रितपणे देवदर्शनासाठी गेले होते, तिथून आल्यानंतरच किरकोळ वाद दोघांमध्ये झाला. त्यातूनच, तरुणाने हे टोकाचं पाऊल उचलल्याची माहिती आहे. दरम्यान, यापूर्वी वैरागच्या सासुरे येथेही बीडमधील एका युवकाने नर्तिकेच्या नादात स्वत:चं जीवन संपवल्याची धक्कादायक घटना घडली होती.

धाराशिवमधील साई कला केंद्रमध्ये नृत्य काम



करणाऱ्या महिलेचा तिच्या प्रियकरासोबत वाद झाला. त्यामध्ये, प्रियकराने आत्महत्या करण्याची धमकी दिली होती, धक्कादायक बाब म्हणजे या धमकीनंतर काही वेळातच प्रियकराने गळफास घेऊन आत्महत्या केली. अश्रुबा अंकुश कांबळे (वय वर्ष २५) या तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याने खळबळ उडाली आहे. अश्रुबा कांबळे रुई ढोकी गावचा रहिवाशी आहे, गेल्या ५ वर्षापासून कला केंद्रातील नर्तिका आणि त्याच्यात अनैतिक प्रेम संबंध असल्याची माहिती समोर आली असून मृत तरुण आणि तरुणी शिखर शिंगणापूर येथे काल देवदर्शनाला गेले, देवदर्शन करून परतत असताना दोघांमध्ये वाद झाला.देव दर्शनावरुन परत येत असताना मृत प्रियकराच्या बायकोचा फोन आला म्हणून नर्तिका आणि अश्रुबा यांच्या वाद झाला होता. त्यानंतर, मी आत्महत्या करतो म्हणून धमकी देत तो निघून गेला. मात्र, प्रियसीने अश्रुबाच्या या धमकीडे दुर्लक्ष करत गांभीर्याने विचार केला नाही. तर, अश्रुबाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची उघडकीस आले. दरम्यान, धाराशिव जिल्ह्यातील येरमाळा पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून पंचनामा व पोस्टमार्टम करून त्यांनी मृत व्यक्तीचे प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात दिले.

## अहिल्यानगर जिल्ह्यातील ३६ ग्रामपंचायतींची दप्तरे गायब! कारवाईची टांगती तलवार

अहिल्यानगर। प्रतिनिधी

जिल्ह्यातील २०२३-२४ च्या आर्थिक वर्षातील लेखापरीक्षणासाठी ३६ ग्रामपंचायतींनी दप्तरच सादर केले नाही. त्यामुळे संबंधित ग्रामपंचायतींचे लेखापरीक्षण होऊ शकलेले नाही. याबाबतचा अहवाल नाशिक विभागीय आयुक्तांकडे गेल्याचे समजले. दरम्यान, संबंधित ग्रामपंचायतींना प्रत्येकी २५ हजारांचा दंड केला जाण्याची शक्यता आहे. जिल्ह्यात स्थानिक लेखा कार्यालयाकडून दर वर्षी ग्रामपंचायतींची लेखापरीक्षणासाठी दप्तर तपासणी केली जाते. सन २०२३-२४ मधील जिल्ह्यातील १३२१ ग्रामपंचायतींच्या कारभाराचे स्थानिक लेखा विभागाच्या माध्यमातून लेखापरीक्षण प्रक्रिया पार पडली. त्यासाठी स्थानिक लेखास्तरच्या विशेष अधिकाऱ्यांचीही नियुक्ती करण्यात आली होती.

लेखापरीक्षणात ग्रामपंचायतीचे दप्तर, कॅश बुक, मासिक सभा, ग्रामसभांचे इतिवृत्त, करवसुली, पाणपट्टी वसुली, महिला व बालकल्याण, दिव्यांग, मागासवर्गीय वस्ती खर्च याचे लेखापरीक्षण करण्यात येते. त्यासाठी ग्रामपंचायतींनी दप्तर सादर करणे गरजेचे असते. मात्र, जिल्ह्यातील ३६ ग्रामपंचायतींनी लेखापरीक्षणासाठी दप्तरच दाखवले नाही. त्यामुळे लेखापरीक्षक हे लेखापरीक्षण न करताच रिकाम्या हाताने परतल्याचे दिसले. जाखुरी, खरशिंदे (संगमनेर), महाकाळ वाडगाव (श्रीरामपूर), ताहाराबाद, जांभळी, दरडगाव थडी, वावरथ (राहुरी), भातोडी पारगाव (नगर), बेलापूर, टिटवी, कातळापूर, मुतखेल (अकोले), सोमठाणे नलावडे, कोल्हार, मोहरी, (पाथर्डी), जवळा, पाटोदा, मुंजेवाडी, सातेफळ, अरणगाव, आपटी, (जामखेड), कौठे मलकापूर, कर्जुले पठार (संगमनेर), कारेगाव (पाथर्डी), नवनागापूर (नगर), बोधेगाव, वरूर बुद्रुक, गोळेगाव, हातगाव, तखमापूर, प्रभूवडगाव, (शेवगाव), घोगरगाव (नेवासा), म्हस्केवाडी, पाडळी आळे, वारणवाडी (पारनेर), पिंपळवाडी (कर्जत.

## केडगाव परिसरात अपघात

### शिवाई बस ओव्हरटेकच्या नादात कंटेनरला धडकली

अहिल्यानगर। प्रतिनिधी

भरधाव वेगात असलेल्या शिवाई बसने कंटेनरला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न करत असताना झालेल्या अपघातात बसमधील सात ते आठ प्रवासी जखमी झाले. यातील दोन प्रवासी गंभीर जखमी असून, त्यांच्यावर शहरातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. केडगावमधील अंबिका बस स्टॉपजवळ रविवारी मध्यरात्री बारा वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. यात शिवाई बसच्या चालकाकडील बाजूचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. एसटी महामंडळाची शिवाई बस ही पुण्याच्या दिशेकडून अहिल्यानगरकडे येत असताना केडगाव अंबिका बस स्टॉपजवळ कंटेनरला ओव्हरटेक करत असताना ही धडक झाली. धडक इतकी जोरदार होती की बसचे मोठे नुकसान झाले आहे. अपघातात बसमधील सात ते आठ प्रवासी जखमी झाले. यापैकी दोन जणांच्या पायाला आणि डोक्याला गंभीर दुखापत झाल्याची माहिती आहे. सर्व जखमींना स्थानिकांच्या मदतीने तत्काळ खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

अपघातानंतर केडगाव परिसरात रस्त्यावर मोठ्या वाहनांची गद झाली. महामार्गावर लांबच लांब रांगा लागल्यामुळे वाहतुकीवर मोठा परिणाम झाला होता. स्थानिक रहिवाशांनी तत्काळ मदत करत जखमींना बाहेर काढले आणि रुग्णवाहिकेला पाचारण केले. रुग्णवाहिकेतून जखमींना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

एसटीच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट दिली. केडगावमध्ये स्कॉयवॉक की भुयारी मार्ग या वादात रस्त्याचे रुंदीकरण रखडले आहे. त्यातच रस्त्याच्या कडेला असलेल्या व्यावसायिक दुकाने, हॉटेलमुळे रस्त्याच्या कडेला वाहने लावण्यात येत असल्याने आधीच अरुंद असलेला रस्ता आणखीन अरुंद होत चाललेला आहे. सातत्याने सोनेवाडी चौक, केडगाव वेशीसमोर वाहतूक कोंडी होत असून, अपघातांच्या घटनांत वाढ होत आहे. या भागात बसविण्यात आलेल्या गतीरोधकांची उंची कमी असून, ही उंची वाढविण्यासह अतिक्रमणे हटविण्याची मागणी नागरिकांतून केली जात आहे.

## आ. बंब यांना धमकीची भाषा, गुन्हा दाखल करण्याची मागणी

संभाजीनगर

गंगापूर - खुलताबादचे आ. प्रशांत बंब यांच्यावर सोशल मीडियावर अवमानकारक व धमकीची भाषा वापरणाऱ्या अमरावतीतील व्यक्तीविरुध्द तत्काळ गुन्हा दाखल करण्याची मागणी करत गंगापूर पोलिस ठाण्यात निवेदन सादर करण्यात आले.

गंगापूर पोलिस ठाण्याचे निरीक्षक कुमारसिंग राठोड यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शिक्षक टीईटी प्रकरणात आमदार बंब यांच्या व्हिडिओला टॅग करून भोयर यांनी काळे फासण्याचा उल्लेख करत अवमानकारक, अश्लील व धमकीची भाषा वापरली. या वक्तव्यामुळे आमदार बंब यांच्या प्रतिष्ठेला धक्का बसल्याचे नमूद करत कायदेशीर कारवाईची मागणी करण्यात आली. छत्रपती संभाजीनगर येथे टीईटी परीक्षा रद्द करण्यासाठी शिक्षक संघटनांनी मोर्चा काढला होता. या पार्श्वभूमीवर लासूरस्टेशन येथे माध्यमांशी संवाद साधताना आमदार बंब म्हणाले होते ङ्घङ्घजवळपास ७० टक्के शिक्षक लाडावलेले आहेत. त्यांनी केलेल्या संपावर केवळ वेतनकपात नव्हे तर सस्पेंशनचाही आदेश काढला पाहिजे.

या विधानाला गंगापूर खुलताबाद तालुक्यातील भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पाठिंबा जाहीर केला आहे. सोशल मीडियावर आमदारांविषयी वापरलेली घोर अवमानकारक भाषा असहनीय असल्याचे नमूद करत, याप्रश्री गुन्हा दाखल करावा व सार्वजनिक माफी मागावी, अशी मागणी निवेदन देताना माजी नगरसेवक प्रदीप पाटील, मारुती खैरे, आनंद पाटील, कृष्णकांत व्यवहारे, राकेश कळसकर, दीपक साळवे, अतुल रासकर, प्रशांत मुळे, रामेश्वर पाटील, अनिल चव्हाण, नंदू सजगुरे, राजेंद्र राठोड, आशीर्वाद रोडगे, गौरव तांगडे, मनोज गायकवाड, संदीप बोजवारे, प्रकाश खाजेकर, तोफिक शहा, गणेश पाटील, रावसाहेब नाबदे, सलमान शेख, संतोष गायकवाड, बंटी पाटील, वैभव धनायत, कल्याण शिंदे, योगेश चव्हाण, ओम कारभार, शिवराज दारुंटे, गोपीचंद जाधव, नंदू पाटील, अशोक पाटील, बापू खाजेकर, रफिक दादा, संदीप आळंजकर यांसह भाजप कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती.

## वसंतदादा पाटील महाविद्यालयात व्याख्यान

पाटोदा । प्रतिनिधी

नवगण शिक्षण संस्था राजुरी चे वसंतदादा पाटील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात आज रोजी वाणिज्य विभागाच्या वतीने अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बळीराम राख प्रमुख अतिथी श्री नवनाथ मिसाळ व श्री अतुल खडके यांची प्रमुख उपस्थिती होती.

अतिथी व्याख्यानाच्या प्रारंभी मान्यवरांचे सत्कार करण्यात आले या कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. कल्याण घोडके यांनी केले त्यानंतर श्री नवनाथ मिसाळ विमा सल्लागार बीड यांनी विद्यार्थ्यांना विमा क्षेत्राचे महत्त्व या विषयावर सखोल मार्गदर्शन केले तसेच श्री अतुल खडके विक्री व्यवस्थापक टाटा ए आय ए बीड यांनी विमा क्षेत्रातील रोजगार संधी या विषयावर मार्गदर्शन केले याप्रसंगी अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. बळीराम राख यांनीही वाणिज्य विषयाचे महत्त्व यावर आपले मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कल्याण घोडके यांनी तर आभार प्रदर्शन वाणिज्य विभागप्रमुख डॉ. पवनकुमार चांडक यांनी केले.

## रन फॉर हेरिटेजमध्ये ११०० धावपटूंचा सहभाग

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

महात्मा गांधी मिशनच्या वतीने रविवारी एमजीएम रन फॉर हेरिटेज मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. मान्यवरांनी झेंडा दाखवून रन फॉर हेरिटेजचे उद्घाटन केले. यामध्ये वयोगटातील सुमारे ११०० धावपटूंनी सहभाग नोंदविला. यावेळी, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, ग्रामीणचे पोलिस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, महाराष्ट्र राज्य राखीव पोलिस बलाचे कामांडंट विक्रम साळी, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, उद्योजक डॉ. रणजित कक्कड, अधिष्ठाता डॉ. प्राप्ती देशमुख, अधिष्ठाता डॉ. जॉन चेल्लादुराई आदी उपस्थित होते.

शहरातील वारसा स्थळांबाबत जनजागृती करीत नागरिकांना या माध्यमातून एकत्रित केले जाते. एमजीएम मॅरेथॉनचे यंदाचे हे दहावे वर्ष होते. या मॅरेथॉनमध्ये पुरुष आणि महिला गटामध्ये स्वतंत्रपणे १४ ते २०, २१ ते ३५ ३६ ते ४५, ४६ ते ५५, ५६ ते ६५ या वयोगटात ही स्पर्धा घेण्यात आली. सुमारे ११०० धावपटूंनी ५ किमी आणि १० किमी स्पर्धेत सहभाग नोंदविला. विविध गटातील प्रथम येणाऱ्या तीन स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पदक आणि रोख पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

त्याचप्रमाणे यावेळी मॅरेथॉनमध्ये सहभाग घेणाऱ्या सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले. या मॅरेथॉनमध्ये विजयी खेळाडूंना एकूण १ लाख ६० हजार रुपयांच्या रोख पारितोषिकांचे मान्यवरांचे हस्ते वितरण करण्यात आले. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी प्रा. शशिकांत सिंग, डॉ. श्रीनिवास मोतीयेळे, डॉ. सदाशिव जव्हेरी, ऐश्वर्या आघाव, प्रा. रहीम खान, डॉ. अमरदीप अस-ेलकर, बालाजी शेळके, जॉय थॉमस, अर्जुन तोडकर, लक्ष्मण सूर्यवंशी, सुनील चव्हाण आदींनी परिश्रम घेतले. पाच वेगवेगळ्या वयोगटात ही मॅरेथॉन पार पडली. यात दहा कि. मी. पुरुष गटातील स्पर्धांमध्ये गणेश पाख शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागाअंतर्गत उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोत्रती अभियानास स्वतंत्र कायमस्वरूपी विभाग म्हणून आस्थाप-नेला मान्यता देऊन कायीता मुटकुळे, संगीता भिसे, शांता जयस्वाल, रूखमीना पतंगे, साधना चंद्रवंशी, उज्वला मोरे, रत्नमाला गोरे, सुजाता लोणे आदींची उपस्थिती होती.

# शेवगाव - नेवासा मार्गावर वाहतूक कोंडी

### रस्त्यावरील खड्डे ठरत आहेत कारणीभूत ; खड्यांच्या नशीबी खडी-डांबर मिळु नये ही शोकांतिका

अहिल्यानगर। प्रतिनिधी

शेवगाव-नेवासा मार्गावर सध्या दररोजच वाहतूक कोंडी नित्याचीच झाली असून वाहतूक धारकांना मोठ्या समस्येला सामोरे जावे लागते आहे. या वाहतूक कोंडी चे मुख्य कारण आहे रस्त्यावरील मोठमोठ्या खड्यांची मालिका जी की गेल्या ११ वर्षापासून लोकप्रतिनिधी आमदार मोनिका राजळे यांची खड्डोखड्डी आठवण करून देते. मागील २/३ वर्षापूर्वी या रस्त्याची दुरुस्ती झाली मात्र १० किमी अंतरावर ४ ठेकेदारांनी काम केले. मात्र घाडगे शाळेशेजारी व जोहरापुर पुल ते हिंगणगाव बस स्थानकापर्यंत रस्ता ( साधारण ३ किमी ) केला होता की नाही अशी शंका आल्याशिवाय राहत नाही. पुढे दत्त पाटी चौफुल्यावरही घाडगे शाळेसमोर असलेल्या खड्यांपेक्षा घातक खड्डे पडलेले आहेत.

सध्या ऊस कारखानदारी वेगवान सुरू आहे. रात्रंदिवस ऊस वाहणारी टॅक्टर, जुगाड, ट्रक वाहने मोठ्या संख्येने या रस्त्यावर रोज धावतात. इतर नेहमीची वाहने व तिर्थक्षेत्र पैठण - मढी- मोहटा- भगवानगड- वृध्देश्वर - मायंबा - शिंगणापूर- देवगड- शिर्डी - वरखेड - भाविनिमगाव आदी ठिकाणी रोजच नवीन भाविकांची वाहणे धावतात यामुळे या रस्त्यावर वाहनांची मोठी ये-जा असते. मात्र खराब रस्त्यामुळे वाहनांचे होणारे घोटाळे व गर्दी यामुळे हा रस्ता कायम वाहनांच्या रेलचेलीत असतो. मध्यंतरी या रस्त्यावरील खड्डे चक्क माती - दगड-मुरुम याने बुजवण्यात आली. ती खड्डे आठवड्याभरातच पुर्वी च्या रुपात दिसू लागली. उलट त्यातील दगड गोटे रस्त्यावर पसरुन अपघातास कारणीभूत ठरत आहेत. या रस्त्यावरील खड्डे खडी डांबर टाकून बुजवून नये इतके दुर्दैव या रस्त्याचे व या भागातील जनतेची दिशाभूल करणारे लोकप्रतिनिधींना निवडणा-या जनतेचेही दुर्दैव म्हणावे लागेल. सध्यातरी या रस्त्यावरचा प्रवास हा कंबरतोड आणि हाडे खिळखिळी करणारा ठरत आहे. पैठण - पाथर्डी- शेवगाव- नेवासा आदी तालुक्यातील तिर्थक्षेत्रांना जोडणारा हा महत्त्वाचा रस्ता तर ज्ञानेश्वर- स्वामी समर्थ- गंगामाई- वृद्धेश्वर व इतर साखर कारखाना ऊस वाहतूक क्षेत्रातील अती महत्त्वाचा रस्ता आहे. हा रस्ता अतिक्रमण हटवून रुंदीकरण करून मोठ्या नुतनीकरण करण्याच्या प्रतिक्षेत आहे. मात्र रस्ता नुतनीकरण लांबच राहिले या रस्त्यावर खड्डे बुजविण्यास साधे खडी-डांबर मिळु नये ही मोठी शोकांतिका म्हणावी लागेल

दैनिक
राज्य लोकतंत्र
बुधवार दि.१० डिसेंबर २०२५ | ६

# बीड जिल्हा परिषदेची इमारत म्हणजे मला पहा आणि पान फुले वहा !

बीड । प्रतिनिधी

कोट्यावधी रुपये खर्च करून बांधण्यात आलेल्या जिल्हा परिषदेच्या इमारतीमध्ये सुविधांचा अभाव दिसून येत आहे स्वच्छतेचे तर विचारूच नका मात्र या ठिकाणी बाहेर तालुक्यातून येणाऱ्यांना पिण्याचे पाणी सुद्धा उपलब्ध नसते अधिकाऱ्यांनाही आपल्याच घरून पाणी घेऊन यावे लागते स्वच्छतेवर खर्च केला जात असला तरी तो केवळ दाखवला जातो ही इमारत म्हणजे मला पहा आणि पानफुले व्हा अशी अवस्था झालेली आहे.



जिल्हा परिषद जिल्ह्याच्या विकासाचे मिनीमंत्रालय मानले जाते. ग्रामीण भागासह जिल्ह्याच्या विकासासाठी ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद ही त्रिस्तरीय यंत्रणा कार्यरत आहे. शिक्षण, आरोग्य, बांधकाम, पाणीपुरवठा, जलसंधारण, ग्रामीण विकास यंत्रणा, जलजीवन, आदी विभागाच्या विविध योजना आणि उपक्रम जिल्हा परिषदेच्या माध्यमातून राबविले जातात. त्यासाठी शासनाने अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची संख्या ठरवून दिली आहे. बीड जिल्हा परिषदेची नवीन इमारतीचे तळमजला आणि वरचे दोन मजल्यावर सर्व सुविधा नसताना, काही कामे झालेली नसतानाही तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी अजित पवार यांच्या काळात तातडीने नवीन इमारतीमध्ये जिल्हा परिषद कार्यालय आणण्यात आले.यावर्षी तळमजल्यात पाणी घुसले. ते काढण्याची यंत्रणाही नसल्याने यंत्रणेची तारांबळ झाली. कर्मचारी आणि बाहेरच्या नागरिकांनी पाणीपुरवठा विभाग आणि अन्य अधिकाऱ्याकडे अनेकदा मागणी करूनही साधे पिण्याचे पाणी अद्यापपर्यंत उपलब्ध झालेले नाही.जिल्हा परिषदेच्या नवीन इमारतीत विविध विभागात अनेक पदे रिक्त ◀◀ पान ३ वर

# गुंठेवारी करण्यासाठी नगरपालिका सफाई कामगारास एक हजाराची लाच घेतांना अटक

**बीड । प्रतिनिधी**

**तक्रारदाराकडून त्याच्या आणि त्याच्या पत्नीचे नावे गुंठेवारी करण्यासाठी एक हजार रुपयाची लाच घेताना बीड नगरपालिकेतील सफाई कामगार अशीश मस्के याला लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने ताब्यात घेतले.**

दिनांक ८ डिसेंबर रोजी मुळ तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड येथे लेखी तक्रार दिली की, दिनांक ०६/११/२०२५ रोजी त्यांचे व त्यांच्या पत्नीचे नावे असलेल्या प्लॉटची गुंठेवारी केलेल्या संचिकेच्या पेपरची पडताळणी करून सत्य प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला होता त्यावरून सदर संचिकेची पडताळणी लवकर करून सत्य प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्यासाठी आलोसे आशिष मस्के यांनी लाचेची मागणी केली परंतु तक्रारदार यांना लाच रक्कम देण्याची ईच्छा नसल्याने ला.प्र.वी. बीड कडे तकार दिली

दिनांक ०९.१२.२०२५ रोजी तक्रारदारानी दिलेल्या तक्रारीची पडताळणी तक्रारदार पंच क्र.०१यांना नगर परिषद कार्यालय बीड येथे आलोसे आशिष मस्के याचे कडे पाठवून लाचमागणी पडताळणी केली असता आलोसे आशिष मस्के यांनी तक्रारदार यांचेकडे त्यानी दिनांक ०६/११/२०२५ रोजी त्याचे प्लॉटची गुंठेवारी केलेल्या संचिकेच्या पेपरची पडताळणी करून साहेबाकडुन गुंठेवारी सत्य प्रमाणपत्र लवकर करुन देण्यासाठी आलोसे आशिष मस्के यांनी १००० रु लाचेची मागणी करून लागलीच लाच रक्कम १००० रु स्विकारण्याचे मान्य केले

दिनाक ९ डिसेंबर रोजी तक्रारदार व पंच यांना नगर परीषद कार्यालय बीड येथे पाठवून सापळा कारवाई आजमावली असता आशिष आप्पासाहेब मस्के यांनी नगर परिषद कार्यालयाचे अभिलेख कक्षा समोर शासकीय पंचासमक्ष लाच रक्कम १००० रु स्विकारले असता मस्के यांना तात्काळ सापळा पथकाने ताब्यात घेऊन लाचेची रक्कम पंचासमक्ष जप्त केली. मस्के विरुध्द दिनांक ९ डिसेंबर रोजी पोलीस ठाणे बीड शहर जिल्हा बीड येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल ◀◀ पान ३ वर

# छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या ऊस बिलाचा हप्ता रु. २७५० प्रमाणे बँकेत वर्ग - मोहन जगताप

माजलगाव । प्रतिनिधी

छत्रपती सहकारी साखर कारखाना लि.सोनोजीनगर सावरगाव ता. माजलगाव जि. बीड या कारखान्याचा गळीत हंगाम २०२५-२६ मधील दि.०१/११/२०२५ ते १५/११/२०२५ या कालावधीत एकूण ४५५४२.९९० मे. टन ऊसाचे गाळप झाले आहे. त्यानुसार प्रति टन रु. २७५०/- प्रमाणे एकूण रक्कम रु. १२,५२,४३,२९६/- रुपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आले आहेत.

काही दिवसांपूर्वी युवा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने ऊस दरवाढीबाबत आंदोलन पुकारण्यात आले होते. या आंदोलनकर्त्यांशी चर्चा करून छत्रपती सहकारी साखर कारखान्याने प्रति टन २७५०/- रुपये भाव जाहीर केला आणि तो एकरकमी देण्याचे घोषित केले होते, आंदोलकांनी हे मान्य करून याचे स्वागत केले. आज युवा शेतकरी संघर्ष समितीच्या आंदोलकांचा सन्मान करत दि.०१ नोव्हेंबर २०२५ ते १५ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत गाळप झालेल्या ऊसाचे बिल



शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आले आहेत.

कारखान्याच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी प्रशासनाने योग्य नियोजन करून ऊसाचे गाळप सुरळीत सुरू ठेवले असून सर्व शेतकऱ्यांचे बिल वेळेवर बँकेत जमा करण्यात येणार असल्याचे सांगितले आहे. कारखान्याचे चेअरमन मा. बाजीराव सोनोजीराव जगताप व संचालक मंडळ यांनी कारखान्याची गाळप क्षमता मर्यादित असतानाही शेतकऱ्यांच्या हिताचे धोरण अवलंबून कोणताही बाय-प्रॉडक्ट नसतांना सुद्धा योग्य भाव दिला आहे. भागातील सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपल्या कारखान्यास सहकार्य करावे व आपापली बिले संबंधित बँकेत संपर्क करून मिळवावीत, अशी विनंती कारखाना प्रशासनाकडून करण्यात आली आहे.

# दिवसाढवळ्या दुकानात चोरी करणारी टोळी उघडकीस

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील कोहिनूर जनरल स्टोअर्स येथून इमिटेशन ज्वेलरी चोरी झाल्याची माहिती पोलिसांना मिळतात त्यांनी तात्काळ तपास करून संभाजीनगर शहरातील पडेगाव भागातील रिक्षा चालक दिलशान खान याला मुद्देमालासह ताब्यात घेतले.

दिनांक ८ डिसेंबररोजी कोहिनूर जनरल स्टोअर्स, बीड येथे इमिटेशन ज्वेलरीची चोरी झाल्याची माहिती बीड शहर पोलिसांना प्राप्त झाली होती. माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ तपास सुरू केला. मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार चोरीमध्ये सहभागी असलेला रिक्षा चालक दिलशान खान पिता इस्माईल खान, वय ४३ वर्ष, रा. पडेगाव, छत्रपती संभाजीनगर यास



## तीन लाखांचा मुद्देमाल जप्त

चोरीच्या मुद्देमालासह ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले. त्याच्याकडून अंदाजे ४०,००० रुपये किमतीची इमिटेशन ज्वेलरी तसेच अंदाजे २.५ लाख रुपये किमतीची रिक्षा असा एकूण ३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तपासात असे उघड झाले की मुख्य आरोपी दिलशान खान हा या टोळीचा प्रमुख असून तोच छत्रपती संभाजीनगरहून चार बुर्खाधारी महिलांना घेऊन बीड शहरात चोरी करण्यासाठी आणत असे, गर्दीच्या वेळेत खरेदीच्या बहाण्याने दुकानात प्रवेश करून चोरी करणे आणि तत्काळ रिक्षाने परत निघून जाणे हीच त्यांची निश्चित पद्धत असल्याचे तपासात समोर आले आहे. चोरीमध्ये सहभागी असलेल्या चार बुर्खाधारी महिला आणि त्यांच्यासोबत असलेल्या आणखी एका इसमाचा पोलीस शोध घेत असून त्यांना अटक करणे बाकी आहे. पुढील तपास सुरू आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सौ. पूजा पवार आणि पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार बबन जाधव, शहेनशहा सय्यद, इलियास शेख, मंगेश शिंदे, रामेश्वर पवार आणि गहिनीनाथ बावनकर यांनी केली आहे.

# योजना शिक्षणाधिकारीपदी किरण कुंवर यांची नियुक्ती

बीड । प्रतिनिधी

धुळे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी श्रीमती किरण कुंवर यांची बीड जिल्हा परिषदेच्या योजना शिक्षणाधिकारीपदी नियुक्तीचे आदेश सोमवार दि.८ डिसेंबर २०२५ रोजी शासनाने काढले आहेत. महाराष्ट्र शासनाचे उपसचिव मो. बा. तासीलवर यांनी सदर आदेश निर्गमित केले आहेत.

महाराष्ट्र शिक्षण सेवा गट अ मधील तत्सम अधिकाऱ्याची प्रशासकीय बदली करण्यात आल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. विहित कालावधीत संबंधितांनी पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू व्हावे, यासाठी आयुक्त शिक्षण यांनी अहवाल सादर करण्याचे आदेशित करण्यात आले आहे.

योजना शिक्षणाधिकारी संजय पंचगल्ले यांची लातूर येथे बदली झाल्यामुळे बीड येथील योजना शिक्षणाधिकारी पद रिक्त होते. या पदावर उपशिक्षणाधिकारी विपुल भागवत यांच्याकडे प्रभारी कार्यभार देण्यात आला आहे.

# भरारी पथकाकडून बोगस खत विक्री करणाऱ्या कंपनी व कृषी सेवा केंद्र यांच्यावर एफआयआर दाखल

बीड । प्रतिनिधी

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन विभागीय कृषी सहसंचालक सुनील वानखेडे जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी सुभाष साळवे, आशीष काळूसे, तंत्र अधिकारी गु. नि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय भरारी पथक प्रमुख साहिल सय्यद, कृषी विकास अधिकारी जिल्हा परीषद सायप्पा गरांडे मोहीम अधिकारी जिल्हा परीषद वल्लभ भोसले जिल्हा गुण नियंत्रण निरिक्षक यांच्या उपस्थितीत गणेश हिरे खत निरिक्षक तथा कृषी अधिकारी (गु.नि.) गेवराई यांनी भोगस खत विक्री करणारे काव्या अग्रो चे प्रतिनिधी राधेशाम काकडे व खत पुरवठा करणारी कंपनी विदूत अग्रो केम प्रा. लि. रायगड चे संचालक निखील कासोळे यांच्या विरूद गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

मिळालेल्या गुप्त माहितिच्या आधारे काल दिनांक ८ डिंसेबर २०२५ रोजी भरारी पथकाने काव्या आग्रो मोंढा रोड गेवरा जिल्हा बीड येथे तपासणी केली असता सदरील ठिकाणी मिश्र खताचे ग्रेड १०:२०:२० व २०: २०: ००. पुढील मजकुराचे एकुन ५५ बॅग (प्रति बॅग ५०) असल्याचे आढळून आले.

१) खताचे नाव - १०:२०:२० ( )-३७ व -२०:२०:०० ( )-१८ २) उत्पादकाचे नाव - मे. जालना ३) खताचा ब्रँड - जय किसान ४) विपणन कर्त्याचे नाव: . . . १८ -६. - ४१०२०६. याबाबत काव्या आग्रो यांना खताचे खरेदी बिले मागितले असता त्यांच्या कडे बिल नसले बाबत सांगितले. त्यानंतर संबंधित उत्पादक शिवाजी ॲग्रो क्रॉप जालनाचे प्रतिनिधी भागीरथी के. यांना भ्रमणध्वनीद्वारे विचारणा केली असता. त्यांनी सांगीतले की शिवाजी ॲग्रो क्रॉप सायन्स जालना चा परवाना करार रदद करनेबाबत दि.४/०२/२०२५ रोजी मा. कृषि संचालक (नि.गुनि.)यांना प्रस्ताव सादर केला आहे. त्यानंतर कंपनीने कोणत्याही प्रकारचे उत्पादन व पुरवठा ◀◀ पान ३ वर

# केजमध्ये भररस्त्यात आईसह मुलाला बेदम मारहाण

केज । प्रतिनिधी

जमिनीच्या किरकोळ वादातून एका महिलेसह तिच्या मुलाला बेदम मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार केज तालुक्यातील सांगवी गावात उघडकीस आला आहे. गावगुंडांनी संबंधित महिलेला आणि तिच्या मुलाला भर रस्त्यात अमानुष मारहाण केली. या दुर्घटनेत महिला गंभीर जखमी झाली आहे.

गंभीर जखमी महिलेवर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.अमानुष मारण्याचा व्हीडीओ मोबाईल कॅमे-यात कैद झाला असून मारहाण करणा-यावर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी महिलेच्या कुटुंबाने केली आहे. बीड जिल्ह्यातील केज येथे एका महिलेला आणि तिच्या मुलाला भर रस्त्यात बेदम मारहाण करण्यात आली. जमिनीच्या वादातून ही मारहाण करण्यात आली असून याआधी या गावगुंडांच्या विरोधात ५ डिसेंबर रोजी पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवण्यात आली होती. मात्र तक्रार का नोंदवली म्हणत गावगुंडांनी महिलेची व तिच्या मुलाची रस्त्यात वाट अडवत मारहाण केली.

# लेफ्टनंट रोहित भोरे यांचा सौताडा शाळेत सत्कार

सौताडा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील सौताडा येथील भारतीय सैन्य दलात नेव्ही विभागात सब लेफ्टनंट या पदावर रुजू झालेले रोहित मारुती भोरे यांनी आपले चार वर्षे खडतर प्रशिक्षण पूर्ण करून नौदलात रुजू झाले. त्यांचा ग्रामस्थ आणी शाळेच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी गावातील तरुण आणी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक गणेश बेदरे हे होते.



पाटोदा तालुक्यातील सौताडा येथील रोहित मारुती भोरे हे या तालुक्यातील एकमेव तरुण नेव्ही सैन्य दलात सब लेफ्टनंट या पदावर रुजू झाले. अत्यंत खडतर परिश्रम करून त्यांनी पाटोदा तालुक्यातील पहिला क्लास वन अधिकारी होण्याचा मान मिळवला. याबद्दल सौताडा ग्रामस्थांच्या वतीने आणि जिल्हा परिषद माध्यमिक शाळेच्या वतीने रोहित भोरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांनी विद्यार्थी व गावातील तरुणांना मार्गदर्शन केले. यावेळी रोहितचे आई-वडीलही उपस्थित होते. ◀◀ पान ३ वर

# प्रत्येक विद्यार्थी लोकशाहीतील मूल्याधिष्ठित नागरिक व्हावा हाच प्रशिक्षणाचा उद्देश -बाबासाहेब उजगरे

वडवणी । प्रतिनिधी

शालेय जीवनातील विद्यार्थी हा भविष्यात लोकशाहीतील एक जबाबदार, संवेदनशील आणि मूल्याधिष्ठित नागरिक व्हावा हा या मूल्यवर्धन प्रशिक्षणाचा मुख्य ध्येय व उद्देश असून महाराष्ट्र शासनाच्या पुढाकाराने या कार्यक्रमाची अंमलबजावणी महाराष्ट्रातील जवळपास सर्व शासकीय अनुदानित व जिल्हा परिषदेच्या शाळांमधून होत आहे. अध्ययन अध्यापन प्रक्रिया कृतीयुक्त व आनंददायी बनवत विद्यार्थ्यांमध्ये मूल्ये व संबंधित क्षमता



विकसीत होण्यासाठी सदरील प्रशिक्षण हे अतिशय उपयुक्त ठरणार आहे, असे प्रतिपादन वडवणी तालुक्याचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी व्यक्त केले.

याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी तालुक्यातील इयत्ता पहिली ते आठवीच्या सर्व शिक्षकांसाठी आयोजित मूल्यवर्धन प्रशिक्षण ३ हे वडवणी शहरातील छत्रपती राजर्षी शाहू महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय याठिकाणी पहिला टप्पा हा दि.२७ नोव्हेंबर ते २९ नोव्हेंबर २०२५ आणि दुसरा टप्पा हा दि.४ डिसेंबर ते ६ डिसेंबर २०२५ अशा दोन टप्प्यांमध्ये मोठ्या हर्षोल्हासात संपन्न झाले. सदरील प्रशिक्षण हे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अंबाजोगाईच्या ज्येष्ठ अधिव्याख्याता प्रनिता देशपांडे मॅडम तसेच वडवणी तालुक्याचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मूल्यवर्धनचे जिल्हा समन्वयक दिपक गर्जे, तालुका समन्वयक विजय खरात, साधन व्यक्ती बजरंग राठोड यांच्या नियोजनाखाली संपन्न झाले. याप्रसंगी सूलभक म्हणून सुग्रिव राजगिरे, ए.बी.महानवर, ज्ञानेश्वर कोठूळे, महादेव लांडगे, राजुदास राठोड, नागेश वास्ते, माधव डोरले, संतोष कोळपकर, शिवाजी चव्हाण, मनिष राऊत, जी.बी.दंदे, पांडुरंग कोळपे यांनी आपली जबाबदारी उत्तमपणे पार पाडली. पहिल्या टप्प्यातील तीन दिवस व दुसऱ्या टप्प्यातील तीन दिवस अशा सहाही दिवशी प्रत्येक शिक्षकाने यात कृतीयुक्त सहभाग नोंदवून अतिशय चांगल्या

# लिंबागणेश परिसरात बिबट्यांची दहशत वाढली

## कृषी पंप आणि दिवसा विद्युत पुरवठ्यासाठी गुरूवारी रास्तारोको आंदोलन -डॉ. ढवळे

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश परिसरात बिबट्या आढळून आल्याने ग्रामस्थ व शेतकरी भयभीत झाले आहेत. रात्रीच्या वेळी कृषी पंपांचे विद्युतपुरवठा सुरू असल्याने शेतकऱ्यांना अंधारात शेतात जावे लागते आणि त्यामुळे त्यांच्या जिवीतास गंभीर धोका निर्माण झाला आहे.



या पार्श्वभूमीवर कृषी पंपांसाठी रात्रीऐवजी दिवसा नियमित विद्युतपुरवठा सुरू करावा, या मुख्य मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्याचे जिल्हा अध्यक्ष डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि. ११ डिसेंबर, गुरुवार रोजी लिंबागणेश बसस्थानक येथे रास्तारोको आंदोलन करण्यात येणार असल्याची लेखी नोटीस जिल्हाधिकारी, कार्यकारी अभियंता महावितरण बीड व सहाय्यक अभियंता उपकेंद्र लिंबागणेश यांना देण्यात आली आहे. ◀◀ पान ३ वर

# परळी नगर परिषद कार्यालय डॉ.भालचंद्र वाचनालयात स्थलांतरित

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी नगर परिषद निवडणुकित मतदान झालेल्या मतदान यंत्रे नगर परिषद कार्यालयात ठेवण्यात आले आहेत. त्याठिकाणी निवडणूक व पोलिस प्रशासनाने गुरुवार ४ डिसेंबर रोजी नगरपालिकेची संपुर्ण इमारत सील केली होती. या पार्श्वभूमीवर नगरपालिकेचे दैनंदिन कामकाज डॉ.भालचंद्र वाचनालयाच्या इमारतीत हलवण्याचा निर्णय नगरपालिका प्रशासनाने घेतला होता. त्यानंतर सोमवार दि. ०८ डिसेंबर पासून डॉ.भालचंद्र वाचनालयाच्या



इमारतीत नगर परिषद सर्व विभागातील कामकाज सुरू करण्यात आले.

नगर परिषद निवडणूक मतदान २ डिसेंबर रोजी शांततेत पार पडले. परळी शहरातील ८८ बुथवरील मतदान यंत्रे निकालापर्यंत ठेवण्यासाठी नगर पालिका इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर स्ट्रॉगरुम तयार करण्यात आले आहेत. त्या ठिकाणी मतदान यंत्रे ठेवण्यात आली. मतदान यंत्राच्या सुरक्षेच्या दृष्टीने २१ डिसेंबर पर्यंत या रुमच्या बाहेर सीसीटीव्ही कॅमेरे बसवुन ते पहाण्यासाठी पार्किंगच्या जागेत मॉनिटर बसवुन व्यवस्था करण्यात ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# ‘शांतता पुणेकर वाचत आहेत’ उपक्रमात साडेसात लाखांपेक्षा अधिक नागरिकांचा विक्रमी सहभाग

**पुणे । प्रतिनिधी**

वाचनाची चळवळ सक्षम करण्यासोबतच पुण्याला पुस्तकांची राजधानी बनवण्यासाठी राबविण्यात आलेल्या ‘शांतता पुणेकर वाचत आहेत’ या उपक्रमाला पुणेकरांनी विक्रमी प्रतिसाद दिला. सुमारे एक लाख ३५ हजारांपेक्षा अधिक नागरिकांनी सायंकाळी पाच वाजेपर्यंत पुस्तक वाचन करून, छायाचित्र अपलोड करीत विश्वविक्रमाकडे वाटचाल केली. सकाळी ११ ते दुपारी १२ या तासाभरात ७० हजारांपेक्षा अधिक नागरिकांनी पुस्तक वाचन करून आपले छायाचित्र वेबसाइटवर अपलोड केले. या वाचन उत्सवात १७ ते २२ वयोगटातील युवकांची संख्या सर्वाधिक होती. पुरुषांपेक्षा महिलांची संख्या काही हजारांनी अधिक होती. आता हा उपक्रम केवळ पुण्यापुरता मर्यादित राहिला नसून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांपासून ते सर्वसामान्यांपर्यंत आपल्या आवडीच्या पुस्तकांचे वाचन केले.

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या (एनबीटी) वतीने पुणे पुस्तक महोत्सव २०२५ येत्या १३ ते २१ डिसेंबर या कालावधीमध्ये फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मैदानावर होत आहे. वाचन संस्कृतीचा कुंभमेळा म्हणून सुपरिचित अशा या महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ‘शांतता पुणेकर वाचत आहेत’ हा उपक्रम मंगळवारी सकाळी ११ ते १२ या वेळेत मोठ्या उत्साहात राबविण्यात आला. शाळा, महाविद्यालय, विद्यापीठे, रेल्वेस्थानक, बसस्थानक, मेट्रो, धार्मिकस्थळे, सार्वजनिक वाचनालय ग्रंथालय, मदरसे,





बसथांबे, पुणे महानगरपालिकेची कार्यालये, जिल्हा प्रशासनाची कार्यालये, सरकारी आणि खाजगी आस्थापने, रिक्षाथांबे, आयटी कंपन्या, उद्योग, सामाजिक संस्था, संघटनांची कार्यालये अशा सर्वच ठिकाणी नागरिक उत्स्फूर्तपणे आवडीची पुस्तके वाचत होते. नागरिकांनी पुस्तक वाचतानाचे छायाचित्र काढून ते पुणे पुस्तक महोत्सवाच्या अंतर्गत तयार केलेल्या लिंकवर अपलोड केले.

या उपक्रमात सकाळी ११ ते १२ या वेळेत ७० हजार २३८ हजार नागरिकांनी लिंकवर आपले छायाचित्र अपलोड केले आहे. त्यामध्ये ३६ हजार ५२३ महिला असून, पुरुषांची संख्या ३३ हजार ७१५ आहे. त्यामुळे पुस्तक वाचनात महिलांनी पुरुषांपेक्षा एक पाऊल पुढे टाकले आहे. आता सर्वांनी अपलोड केलेल्या छायाचित्राच्या माध्यमातून ‘शांतता पुणेकर वाचत आहेत’ हे वाक्य तयार करून त्याचा ‘गीनेस बुक ऑफ रेकॉर्ड्स’मध्ये विश्वविक्रमाची नोंद करण्यात येणार आहे. या विश्वविक्रमासाठी कोहिनूर ग्रुपचे कृष्णकुमार गोयल यांचे पाठबळ लाभले असून त्यांच्याकडून आवश्यक ती मदत करण्यात येत आहे, असे पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे यांनी सांगितले.

**विधिमंडळ अधिवेशनातही पुस्तक वाचन**

नागपुरात विधिमंडळ अधिवेशन सुरू असून, तेथेही ‘शांतता पुणेकर वाचत आहेत’ या उपक्रमाची छाप पाहायला मिळाली. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील , केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, विधानसभेचे अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, उपसभापती अण्णा बनसोडे, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे, राज्य मंत्री माधुरी मिसाळ, भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्यासह मंत्री, खासदार, आमदार, माजी नगरसेवक यांनी सहभाग नोंदवत आपल्या आवडीच्या पुस्तकाचे वाचन करीत, उपक्रमाला सक्रिय पाठिंबा दिला. त्याचप्रमाणे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र - कुलगुरू डॉ. पराग काळकर, गोविंद देवगिरी महाराज, सोमनाथ पाटील, कृष्णकुमार गोयल असे अनेक मान्यवरांनी पुस्तकाचे वाचन केले.

**एकूण सहभाग साडेसात लाखांपेक्षा अधिक –**

‘शांतता.. पुणेकर वाचत आहेत’ या उपक्रमाला सार्वजनिक ठिकाणी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकूण आलेल्या छायाचित्रांपैकी सुमारे दहा हजार छायाचित्र हे शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्थांमध्ये सामूहिक वाचन करतानाचे आहेत. यातील एका छायाचित्रात साधारण शंभर विद्यार्थी किंवा नागरिक आपल्या आवडीच्या पुस्तकांचे वाचन करतानाचे आहे त्यामुळे या उपक्रमात एकूण पुस्तक वाचत सहभागी झालेल्यांची संख्या साडेसात लाखांपेक्षा अधिक आहे, असे राजेश पांडे यांनी सांगितले.

## लष्कर पोलीस ठाण्याच्या गंभीर गुन्ह्यातील आरोपी जेरबंद; गुन्हे शाखा युनिट-२ ची कामगिरी

**पुणे । प्रतिनिधी**

लष्कर पोलीस ठाणे येथे दाखल गंभीर स्वरूपाच्या जबरी चोरीच्या प्रकरणातील पाहिजे आरोपीला गुन्हे शाखा युनिट २ यांच्या पथकाने अटक केली आहे. या कारवाईनंतर पोलिसांनी आरोपीला पुढील तपासासाठी लष्कर पोलीस ठाण्याच्या ताब्यात दिले आहे. जाहिद कमरुदीन शेख (२०, रा. लोहियानगर) असे अटक आरोपीचे नाव आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २० नोव्हेंबर रोजी लष्कर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका पेट्रोल पंपाच्या कार्यालयामध्ये जबरदस्तीने प्रवेश करून फिर्यादीसह इतरांना आत कोंडून ठेवण्यात आले. यानंतर त्यांना धमकावून जबरी चोरी केल्याची घटना घडली होती. या प्रकरणी लष्कर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखा युनिट-२ यांच्या मार्फत सुरू होता. दरम्यान सोमवारी गस्तीदरम्यान पोलीस अंमलदार अजीम शेख आणि सददाम तांबोळी यांना आरोपी लोहियानगर असल्याचे समजले. ही माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष सोनवणे यांनी पथकाला तत्काळ कारवाईचे आदेश दिले. त्यानुसार पथकाने धाड टाकून आरोपीला जेरबंद केले. ही यशस्वी कामगिरी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) पंकज देशमुख, उपायुक्त (गुन्हे) निखील पिंगळे, सहायक पोलीस आयुक्त विजय कुंभार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष सोनवणे यांच्या सूचनेनुसार सहायक पोलीस निरीक्षक अमोल रसाळ, अंमलदार संजय जाधव, विनोद चव्हाण, शंकर नेवसे, नागनाथ राख, संदिप शिर्के, विशाल दळवी, विजयकुमार पवार, संजय टकले, शंकर कुंभार, संजय आबनावे, गणेश थोरात, ओमकार कुंभार, योगेश मांढरे, सर्जेराव सरगर, सददाम तांबोळी आणि अजीम शेख यांच्या पथकाने केली.





## कोथरूड येथे अग्निसुरक्षा व प्रथमोपचारावर विशेष जनजागृती प्रशिक्षण संपन्न

**पुणे । प्रतिनिधी**

एमवायवी इंजिनिअरिंग अँड रिसर्च फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने ८ डिसेंबर २०२५ रोजी श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील विद्यालय, कोथरूड येथे विद्यार्थी व शिक्षकांसाठी व्यापक अग्निसुरक्षा आणि प्रथमोपचार जनजागृती प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

फाउंडेशनच्या संचालिका साविता लांगडे व योगिता जोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली एक्ळ स्वयंसेवकांनी विद्यार्थ्यांना आगीचे प्रकार, फायर एक्स्टिंग्विशरचे प्रकार आणि पोर्टेबल अग्निशामक यंत्राचा योग्य वापर याबाबत सविस्तर माहिती दिली. प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे आग कशी विझवावी हे शिकवण्यात आले.

तसेच साप चावणे, भाजणे, हाड मोडणे, विषबाधा यासारख्या आपत्कालीन परिस्थितीत प्रथमोपचार कसा करावा, बेसिक लाइफ सपोर्ट (इङड) आणि सीपीआर (उझठ) कसे द्यावे याची प्रत्यक्ष प्रात्यक्षिके दाखवून जीव वाचवण्याच्या प्राथमिक पद्धती शिकवण्यात आल्या. कार्यक्रमाला मुख्याध्यापिका जयश्री जावळे, सहशिक्षक कारोटे सर, पठाण सर, खंडागळे सर, शिक्षकेतर कर्मचारी आत्राम सर, सेवक विजय बाविस्कर व सच्चीदानंद निळकंठ यांच्यासह सर्व शिक्षक-विद्यार्थी उपस्थित होते. हा उपक्रम शाळेत सातत्याने राबवला जात असून यंदाचे सत्र विशेष माहितीपूर्ण व उपयुक्त ठरल्याचे शिक्षक व शिक्षकांनी सांगितले.

## महावितरणचे संचालक राजेंद्र पवार दिव्यांग भूषण पुरस्काराने सन्मानित

**पुणे । प्रतिनिधी**

**महावितरणचे संचाल**क (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांना मंगळवारी ‘दिव्यांग भूषण पुरस्कार’ या अत्यंत प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महावितरणमध्ये कार्यरत असणाऱ्या दिव्यांग बांधवांच्या कल्याणासाठी त्यांनी केलेल्या अतुलनीय आणि सातत्यपूर्ण कार्याची दखल घेऊन त्यांना हा बहुमान प्रदान करण्यात आला आहे.



महाराष्ट्र राज्य अपंग (दिव्यांग) कर्मचारी व अधिकारी संघटना, मुंबई यांच्या वतीने राजेंद्र पवार यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या नेतृत्वाखाली महावितरणमध्ये दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या हितासाठी अनेक महत्त्वपूर्ण आणि मैलाचे दगड ठरतील असे निर्णय घेण्यात आले आहेत. विशेषतः, दिव्यांग अधिकारी-कर्मचाऱ्यांना पदोन्नती आणि नियुक्ती प्रक्रियेत कोणत्याही परिस्थितीत योग्य न्याय मिळावा यासाठी संचालक राजेंद्र पवार यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या या कार्यपद्धतीमुळेच महावितरणमधील दिव्यांग बांधवांमध्ये एक मोठा आशेचा किरण निर्माण झाला आहे.

यावेळी संघटनेचे विद्युत विभागाचे अध्यक्ष विलास शिंदे, संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुभाष चव्हाण, रंजन बल्लमवार तसेच महावितरणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी संजय ढोके यांच्यासह संघटना आणि महावितरणचे अनेक अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

## पिंपरखेडमध्ये आणखी एक बिबट्या जेरबंद; वनविभागाची कारवाई





**शिरूर । प्रतिनिधी**

पिंपरखेड (ता. शिरुर) येथे वनविभागाकडून लावण्यात आलेल्या पिंजऱ्यात मंगळवारी (दि. ०९) रोजी पहाटे सहा वर्षीय मादी संवर्गातील बिबट्याला जेरबंद करण्यात वनविभागाला यश आले. आजूबाजूच्या परिसरात बिबट्या निदर्शनास येत असल्याने स्थानिकांच्या मागणीवरून शेतकरी रोहिदास टेमकर यांचे शेतात लावण्यात आलेल्या पिंजऱ्यात हा बिबट जेरबंद झाला असल्याची माहिती शिरूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी नीलकंठ गव्हाणे यांनी दिली. वनरक्षक लहू केसकर व महेंद्र दाते यांनी ही कारवाई करत बिबट्याला माणिकडोह येथील बिबट निवारण केंद्रात दाखल केले.

मागील दोन महिन्यात तीन जणांच्या मृत्यूनंतर ॲक्शन मोडवर आलेल्या वनविभागाने पिंजऱ्यांची संख्या वाढवत आत्तापर्यंत या परिसरात सुमारे २२ बिबटे जेरबंद केले आहेत. यामुळे स्थानिकांनी सुटकेचा श्वास सोडला असला तरी अद्यापही या भागात विविध ठिकाणी बिबट्यांचे वास्तव्य असल्याचे दिसून येत असून वनविभागाने या कारवाया पुढे कायम चालू ठेवाव्यात अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. ध्याच्या काळात ऊसतोडणीचा हंगाम चालू असल्याने बिबटे हे अन्न पाण्याच्या शोधात मुक्त संचार करत बाहेर येत आहे. वनविभागाकडून बिबट जेरबंद करण्याची मोहीम सुरू आहे. मात्र तरी देखील नागरिकांनी आपली काळजी घ्यावी, असे आवाहन सहायक वनसंरक्षक स्मिता यांनी केले आहे.

## मराठवाडा मित्रमंडळ पॉलिटेक्निकचा आघाडीच्या दोन कंपन्यांसोबत सामंजस्य करार

**पपरी । प्रतिनिधी**

शैक्षणिक वातावरण समृद्ध करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या करिअर संधीला बळ मिळण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत मराठवाडा मित्रमंडळ पॉलिटेक्निकच्या संगणक विभागाने एन्थ्रॉलटेक प्रायव्हेट लिमिटेड आणि फोराईज सॉफ्टवेअर सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड कंपन्यांसोबत सामंजस्य करार केला .

हा करार सैद्धांतिक ज्ञान आणि औद्योगिक पद्धतींमधील अंतर भरून काढणारा दूरगामी दृष्टिकोन दर्शवत दीर्घकालीन ध्येय साध्य करण्याची शाश्वती प्रदान करतो . एनथ्रॉलटेक प्रायव्हेट लिमिटेड हे एक आघाडीचे एजंटिक ए. आय-संचालित, एंटरप्राइझ-





क्लास स्किलिंग प्लॅटफॉर्म असून फोराइज सॉफ्टवेअर सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड आयटी इन्फ्रास्ट्रक्चर कन्सल्टन्सी, ऑनसाइट ऑफसाइट सेवा, कस्टम सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, वेब डेव्हलपमेंट, सॉफ्टवेअर व अप्लिकेशन टेस्टिंग आणि एंटरप्राइझ आर्किटेक्चर कन्सल्टिंगसह व्यापक सेवा पुरवते . ही भागीदारी विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, कॅम्पस ड्राइव्हद्वारे पूर्ण-वेळ प्लेसमेंट संधी, कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रम आणि बूट कॅम्प, संसाधने किंवा नाविन्यपूर्ण प्रकल्पांना मार्गदर्शन प्रदान करेल. संगणक शाखेचे विभाग प्रमुख विकास सोळंके आणि पॉलिटेक्निकचे प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी गणेश म्हाळंकर ह्यांचा उपस्थितीत हा करार एन्थ्रलचे सह-संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी समीर इनामदार, फोराइज सॉफ्टवेअर सोल्युशन्सचे गजानद बिराजदार , सुनील देवकुळे व मराठवाडा मित्र मंडळ पॉलिटेक्निकच्या प्राचार्या गीता जोशी यांच्या स्वाक्षरीने पूर्ण झाला. हा सामंजस्य करार विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञानच नव्हे तर स्पर्धात्मक जागतिक परिदृश्यात यश मिळवण्यासाठी आवश्यक असलेल्या औद्योगिक क्षमतांनी सक्षम करण्याच्या महाविद्यालयाच्या ध्येयाची पुष्टी करतो असे संस्थेचे कार्याध्यक्ष बी.जी. जाधव ह्यांनी म्हणत सर्वांचे अभिनंदन केले .

## पहाटे दशक्रिया विधीसाठी निघालेल्या महिलेवर बिबट्याची झडप

**वाघोली । प्रतिनिधी**

दशक्रिया विधीसाठी पहाटे घराबाहेर पडलेल्या महिलेवर अष्टापूर परिसरात मंगळवारी (दि. ९ डिसेंबर) पहाटे बिबट्याने अचानक हल्ला केला. यात अंजना वाल्मिक कोतवाल या महिला गंभीर जखमी झाल्या असून, त्यांच्यावर वाघोली येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, पहाटे साडेचार-पाचच्या सुमारास अंजना कोतवाल या दशक्रिया विधीसाठी घराबाहेर पडल्या होत्या. अंधारात दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्यावर झडप घातली. बिबट्याच्या नखे व दातांच्या माऱ्याने त्यांच्या डोक्याला, मानेला आणि पायाला गंभीर जखमा झाल्या. त्या मोठ्याने ओरडल्याने बिबट्या जंगलाकडे पळाला, तर आजूबाजूच्या नागरिकांनी धाव घेऊन अंजना यांना तात्काळ रुग्णालयात दाखल केले.

सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून, धोका टळला आहे.या घटनेनंतर अष्टापूर आणि परिसरातील नागरिकांमध्ये प्रचंड संताप व भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामस्थांनी एकत्र येऊन बिबट्याचा तात्काळ बंदोबस्त करावा, अशी आक्रमक मागणी केली आहे. घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले असून, पिंजरा लावणे व बिबट्याचा शोध घेण्यास सुरुवात केली आहे.सध्या वाघोली-लोणीकंद परिसरात बिबट्याच्या वावराच्या तक्रारी वाढल्या असून, नागरिकांनी पहाटे किंवा संध्याकाळी एकटे बाहेर पडू नये, असे आवाहन वनविभागाने केले आहे.

## महापालिका सार्वत्रिक निवडणूक प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिद्धीस मुदतवाढ

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभागनिहाय विभाजित प्रारूप मतदार यादीवरील प्राप्त हरकती व सूचनांच्या परीक्षणाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने १५ डिसेंबर २०२५ पर्यंतची मुदतवाढ दिली आहे. याआधी महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्याची पूर्वनिर्धारित तारीख १० डिसेंबर २०२५ होती.




राज्य निवडणूक आयोगाने जारी केलेल्या सुधारित कार्यक्रमानुसार, प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी १५ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध केल्यानंतर मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी २० डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे, तर मतदान केंद्रनिहाय मतदार यादी ही २७ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे. सुधारित कार्यक्रमानुसार संबंधित प्रशासकीय प्रक्रिया आणि निवडणूक तयारीची पुढील कार्यवाही नियुक्त कालमर्यादेत पूर्ण करण्यात येणार आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ, ब, क, ड, इ, ग व ह क्षेत्रीय कार्यालयांमध्ये तसेच सावित्रीबाई फुले स्मारकातील कार्यान्वित कक्षामध्ये नागरिकांनी आपल्या हरकती व सूचना निर्धारित मुदतीत सादर केल्या आहेत. प्राप्त अर्जांचे परीक्षण प्रगतीपथावर असून वाढीव मुदतीमुळे प्राप्त प्रकरणांची तपशीलवार पडताळणी करणे आणि प्रभागनिहाय यादीची अचूकता सुनिश्चित करणे अधिक सुलभ होणार आहे.

## शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त ‘राष्ट्रवादी’कडून ८५ हजार रक्त बाटल्या संकलन मोहिमेची घोषणा

**पुणे । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार पक्ष) यांच्या वतीने ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय कृषीमंत्री शरदचंद्र पवार यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभर भव्य रक्तदान व आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. पवार १२ डिसेंबर रोजी ८६ व्या वर्षात पदार्पण करत असून त्यानिमित्त १२ डिसेंबर ते १२ जानेवारी या एक महिन्याच्या कालावधीत महाराष्ट्रातील विविध भागात रक्तदान शिबिरे घेण्यात येणार आहेत. या उपक्रमात ८५ हजार रक्त बाटल्या संकलित करण्याचा निर्धार पक्षाने जाहीर केला आहे. महाराष्ट्रात रक्ताचा तुटवडा जाणवत असल्याच्या पार्श्वभूमीवर ही मोहिम महत्त्वाची ठरणार आहे, असा पक्षाचा विश्वास आहे. पुण्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्यालय, डेंगळे पूल, शिवाजीनगर येथे १२ डिसेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता या मोहिमेच्या संकल्पाचे उद्घाटन होणार आहे. पुणे शहर अध्यक्ष प्रशांत जगताप आणि डॉक्टर सेलचे प्रदेश प्रमुख डॉ. सुनील जगताप यांनी नागरिकांनी या सामाजिक उपक्रमात उत्साहाने सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले आहे. पक्षाच्या वतीने राज्यातील रक्तपेढ्यांना आवश्यक तेवढा रक्तसाठा उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवत हा उपक्रम राबवला जाणार असून, पक्ष कार्यकर्त्यांसह सर्वसामान्य नागरिकांचीदेखील मोठ्या प्रमाणात भागीदारी अपेक्षित आहे.



## बिबट्याला रोखण्यासाठी स्वाती पाचुंदकर यांचा पुढाकार; पिंपरी दुमाला शाळेला मिळाले संरक्षण

**रांजणगाव । प्रतिनिधी**

वन्य प्राण्यांच्या वाढत्या हालचाली आणि हल्ल्यांच्या घटनांमुळे शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षितता हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा झाला आहे. या पार्श्वभूमीवर, माजी जिल्हा परिषद सदस्या स्वाती पाचुंदकर यांनी शिरूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा, पिंपरी दुमाला येथे स्वखर्चातून लोखंडी संरक्षक जाळी बसवून देत विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न मार्गी लावला आहे.



पिंपरी दुमाला शाळेत अलीकडेच बिबट्या आढळल्याने पालक चिंतेते होते. शाळेच्या संरक्षक भिंतीवर काही ठिकाणी लोखंडी जाळी नसल्यामुळे बिबट्या शाळेत घुसण्याची शक्यता पाचुंदकर यांच्या निदर्शनास आली. त्यांनी तात्काळ याची दखल घेऊन, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत, कोणत्याही विलंबाशिवाय स्वखर्चातून शाळेच्या परिसरात मजबूत लोखंडी संरक्षक जाळी बसवून दिली.

यामुळे शाळेच्या सुरक्षिततेत मोठी वाढ झाली असून, पालक आणि विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.नुकत्याच आयोजित सोहळ्यात या संरक्षक जाळी बसविण्याच्या कामाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य, शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, माजी विद्यार्थी संघाचे प्रतिनिधी, ग्रामस्थ, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वाती पाचुंदकर यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी पुढील काळातही आवश्यक ते सहाय्य देण्याचे आश्वासन दिले.याप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य स्वाती पाचुंदकर, आशा शेलार, शरद खळदकर, शरद दुर्गे, प्रकाश चिखले, तेजश्री चिखले, अभिषेक शेळके, सुनील सोनवणे,अर्जुन शेळके, माणिक म्हाळसकर, बबन चिखले, कांताराम शिंदे आदी उपस्थित होते.